# संगीतसूर्य केशवराव भोसले

## आधुनिक मराठी रंगभूमीचे शिल्पकार

▪ डॉ. सतीश पावडे



स्मृति शताब्दी वर्ष
2020-2021



# संगीतसूर्य केशवराव भोसले

## आधुनिक मराठी रंगभूमीचे शिल्पकार

**डॉ. सतीश पावडे**

स्मृति शताब्दी वर्ष : ४ ऑक्टोबर २०२० ते २०२१

ISBN : 978-81-944283-8-1

८४, अविशा, जैतनवन सोसायटी, शास्त्री ले-आऊट,
खामला, नागपूर - ४४००२५ मोबा. ९३७३२७१४००
aavinashbag@gmail.coma

- **संगीतसूर्य केशवराव भोसले**

  आधुनिक मराठी रंगभूमीचे शिल्पकार


  **- डॉ. सतीश पावडे**

  ९५, आशा कॉलनी, तपोवन रोड, अमरावती-४४४६०२

  Email id : satishkumarpawade1963@gmail.com

  भ्रमणध्वनी : ९३७२१५०१५८, ९४२२५३५१५८


  ISBN : 978-81-944283-8-1

- प्रथम आवृत्ती : दि. ४ ऑक्टोबर २०२०

  (संगीतसूर्य केशवराव भोसले यांचा स्मृति दिवस)


© **डॉ. निशा शेंडे**


  ९५, आशा कॉलनी, तपोवन रोड, अमरावती-४४४६०२

  Email id : drnishashende@gmail.com

  भ्रमणध्वनी : ९३७०१५३०५५


- मुखपृष्ठ : **सी.डी. शिवणकर**
- कम्पोज/टाईप/मुद्रण : **स्कॅन डॉट कॉम्प्युटर,** नागपूर
- प्रकाशक : **आविशा प्रकाशन,** नागपूर
- वितरण :

  **- श्री. राजू बावने**

  (अध्यक्ष - युवा कला सांस्कृतिक बहुउद्देशीय संस्था, वर्धा)

  भ्रमणध्वनी : ९२८४८६६०३५

  **- श्री. सुशीलदत्त बागडे**

  (जिगिषा सांस्कृतिक संस्था, अमरावती)

  भ्रमणध्वनी : ९३७०८८९२११/९३७२४७०९०८

  **आकार पब्लिकेशन,** नागपूर

  भ्रमणध्वनी : ९८२२५६५७८२

  **- श्री. प्रदीप पाटील**

  (जाणिव प्रतिष्ठान, अमरावती)

  भ्रमणध्वनी : ९८६०८३१७७६, ९४२१०५५२०६

  **- श्री. रवी माहोड**

  (मराठा सेवा संघ, अमरावती)

  भ्रमणध्वनी : ९८२३५५१०८१

- **मूल्य : १०० रु.**

# प्रेरणा स्थान



**रमाबाई बाबारावजी पावडे**

माझी आई
जिच्या काळजी आणि प्रेमामुळे
हा लेखन प्रपंच अल्पावधितच
मी पूर्ण करू शकलो.
लेखन कार्य सुरू असताना
हळूच येऊन डोक्यावर-पाठीवर
हात फिरवत आपला आशीर्वाद
ती देत होती.
बहुदा लिहणे-वाचणे हे खूप
मोठे, कष्टाचे काम असावे, असे
तिला वाटत होते. तिच्याच मुळे
जिद्दीने काही 'दिवस-रात्रीत' हे चरित्र
पूर्ण झाले. हे पुस्तक तिच्यासाठीच...!

**- सतीश**

# अर्पण पत्रिका

साक्षेपी इतिहास संकलन, संपादन आणि
लेखन करण्याची दृष्टी देणारे
**गुरुवर्य आ.ह. साळुंखे सर**

बहुजन संघर्षाच्या अंतरंगाची
ओळख करून देणारे
बहुजन संघर्ष पाक्षिकाचे संपादक
**नागेश चौधरी**

माझ्या वैचारिक जडणघडणीत
ज्यांचा मोलाचा वाटा आहे ते
स्मृतिशेष
**पत्रमहर्षि म.य. उपाख्य बाबा दळवी**
**विचारवंत प्रा. डॉ. भा.ल. भोळे**
**विचारवंत प्रा. जैमिनी कडू**

यांना माझे हे पुस्तक
अर्पण करीत आहे.

**- सतीश**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ऐसा केशव पुन्हा न होणे | विद्याधर गोखले | ६ |
| नमितो तुज केशवा | डॉ. भोजराज चौधरी | ७ |
| नाट्यकलेचा कौत्सुभमणी | बालगंधर्व | ८ |
| नमन... | | ९ |
| प्रस्तावना | | १२ |
| जन्म आणि बालपण | | १५ |
| संघर्षमय कारकिर्दीचा प्रारंभ | | १८ |
| केशवाय नमः | | २० |
| गायकी आणि अभिनय | | २२ |
| महत्वाकांक्षी व्यक्तिमत्व | | २५ |
| सामाजिक बांधिलकी | | २८ |
| जाती पेक्षा गुणवत्ता श्रेष्ठ | | ३३ |
| ललितकलादर्शचे लोकशाहीकरण | | ३६ |
| साभिनय गायनाचा आदर्श | | ३९ |
| स्वाभिमानी मर्द मराठा | | ४२ |
| प्रयोगशिलता | | ४५ |
| अंधश्रद्धेला विरोध | | ४८ |
| पाश्चात्य नवनाट्यतंत्राचा पुरस्कार | | ५० |
| आधुनिक मराठी रंगभूमीचे शिल्पकार | | ५४ |
| अष्टपैलू संगीतसूर्य | | ५८ |
| 'शहा शिवाजी' अखेरचे नाटक | | ६० |
| ऐसा केशव पुन्हा न होणे! | | ६३ |
| उपलब्ध चरित्र साधने | | ६६ |
| ललितकलादर्शचा नटवर्ग | | ६९ |
| संगीतसूर्य यांच्या गाजलेल्या भूमिका | | ७० |
| समकालिन दिग्गज (छायाचित्रे) | | ७१ |
| संगीतसूर्य केशवराव भोसले यांचा जीवनपट | | ७२ |
| संदर्भग्रंथ सूची | | ७५ |
| डॉ. सतीश पावडे यांनी लिहिलेले चरित्र ग्रंथ | | ७७ |
| डॉ. सतीश पावडे यांची साहित्य संपदा | | ७८ |
| डॉ. सतीश पावडे यांना मिळालेले पुरस्कार | | ७९ |

# ऐसा केशव पुन्हा न होणे

समर्थ ज्याचे सतेज गाणे, समशेरीचे जणुं लखलखणे!
कंठमणी तो रंगदेविचा, ऐसा केशव पुन्हा न होणे!

चारूदत्त हा 'दत्त उपासक', सत्कार्याला दिधली दाने!
अगे रसिकते! वसंतसेने!, ऐसा केशव पुन्हा न होणे!

इथे न नाजुक मोर-पिसारा, पण गरूडाचे गगन भेदणे!
मर्म मराठी बुलंद बाणा, ऐसा केशव पुन्हा न होणे!


पाच पांढरी पट्टीमधले, पल्लेदार पहाडी गाणे,
आज कोठले जमान्यांत या?, ऐसा केशव पुन्हा न होणे!

जये शिकविले शत-विपदांची, झुंजत-झुंजत फळी फोडणे!
खरा धैर्यधर कला-धुरंधर, ऐसा केशव पुन्हा न होणे!

सारे अभिनय-गायन-वैभव, देव-दत्त हे देशहितास्तव!
असे मानिले सदैव ज्याने, ऐसा केशव पुन्हा न होणे!

रंगभूमिवर अनेक केल्या, सुधारणा नवनवीन ज्याने,
शिस्तशीर, व्यवहार-कुशल तो, ऐसा केशव पुन्हा न होणे!

लोकाश्रयची वंद्य मानिला, राजाश्रय नाकारून ज्याने
'ललितकला'-आदर्श उभविला, ऐसा केशव पुन्हा न होणे!



अगा केशवा! तुझे तपोबल, बलशाली मन ध्येय-दिवाणे,
दिसे न कोठे म्हणूनी वदतो, ऐसा केशव पुन्हा न होणे!

**- विद्याधर गोखले**

# नमितो तुज केशवा

शंभोहर गंगाधर गिरिजा गणराजा, नामितो तुज केशवा ॥ धृ.॥
रंग देवतेचे तुज आशिष, त्रिशुल धराचे तुला शिवाशिष
गान देवता प्रसन्न तुजला. नमितो तुज केशवा ॥ १ ॥
उंच स्वरांचे तुझेच गायन, कंठ पहाडी गगन ये भेटून
रंगभूमिचा धैर्यधर अर्जुन, नमितो तुज केशवा ॥ २ ॥
दरबाराचा मोह नसे तुज, नाट्यकर्मी तू हेच तुझे व्रत
सप्तस्वरांचे तुला स्वराशिष, नमितो तुज केशवा ॥ ३ ॥
रंगभूमिचा तू उध्दारक, राष्ट्र भक्तिने होता प्रेरित
दानधर्मी तू नवसंशोधक, नमितो तुज केशवा ॥ ४ ॥
संगीतसूर्य तू रंगभूमिचा, प्रसाद तुजला ओंकाराचा
कंठी कौस्तुभ मनि रसिकांचा, नमितो तुज केशवा ॥ ५ ॥
पाच पांढरी मूळ तुझा स्वर, लखलखणारा तू स्वरभास्कर
तुझ्या पूजना ये सिद्धेश्वर, नमितो तुज केशवा ॥ ६ ॥
ललित कलांचा तू अभ्यासक, राग श्रुतींचा सुस्वर गायक
मोहित होते रसिक तुझ्यावर, नमितो तुज केशवा ॥ ७ ॥
स्त्री सन्मान अन उचनिचता, भेद कधीना मनिही धरिता
देशभिमानी कला उपासक, नमितो तुज केशवा ॥ ८ ॥
संगीता सम अभिनय रंगत, संवादाची तुझी नवी रित
'भोजराज' हा शरण तुला नित, नमितो तुज केशवा ॥ ९ ॥
रंगभूमिचा तुच धैर्यधर। गोपीचंद समशेर बहाद्दर।
तूच अर्जुन भारत शंबुक। तूच सुभद्रा शाहू नारद।
शहा शिवाजी तूच धुरंधर। अभिनय गायन तुझेच सुंदर।
तुझी शारदा रसिक शिरावर। कृपा तुझ्यावर ठेवी नंदेश्वर ॥ १० ॥



**- डॉ. भोजराज चौधरी**

# नाट्यकलेचा कौत्सुभमणी



केशवराव हा शब्द ऐकला तरी माझ्या अंगावर काटा उभा राहतो. गुरुवर्य भास्करबुवांनी 'संयुक्त मानापमाना'तल्या प्रयोगाबद्दल नापसंती दर्शविली होती. ती बरोबर होती. केशवराव 'धैर्यधर' व मी 'भामिनी' असा जोडा रंगभूमीवर आल्यावर मी उणा पडेन, हे त्यांनी आधीच ओळखले होते. प्रत्यक्ष प्रयोगात केशवरावांनी मला खाऊन टाकले. 'टकमक पाही' या पदाला मी दोन वन्समोअर घेतले, कारण तो पर्यंत धैर्यधर रंगभूमीवर आलेला नव्हता. पण 'माता दिसली' हे प्रकर्षाने तार सप्तकाकडे ओढ घेणारं, सिंदुरा रागातील दणकट, बलदंड प्रकृतीचं पद गाऊन धैर्यधराने जेव्हा तीन वन्समोअर घेतले तेव्हा पहिल्या अंकातच मी नर्व्हस झालो. पुढे धैर्यधर 'झाले युवती मना' हे पद म्हणून निघून जाताच, भामिनी प्रवेश करून 'मला मदन भासे हा' हे पद सुरू करते. पण केशवरावांच्या पदाने मी आणखी नर्व्हस झालो की ऑर्गनवाल्यांनी 'टचिंग' देऊन सुध्दा मी रंगभूमीवर आलो नाही. केवढी ही फजिती माझी?

केशवरावांचा हेवा त्यांच्या हयातीत मी केलेला आहे. कशाबद्दल? ते एका मोठ्या कंपनीचे मालक होते म्हणून. पण आज मी त्यांचा हेवा एका कारणासाठी करतो, की ते ऐन उमेदीत मरण पावले म्हणून पंचविसाव्या-तिसाव्या वर्षी मरण पावले म्हणून. केशवरावांची जेव्हा अंत्ययात्रा निघाली, तेव्हा हजारो लोक त्या ठिकाणी धाय मोकलून रडत होते. नाट्यकलेच्या गळ्यातला एक कौस्तुभमणी, एक रत्नहार आज नाहीसा झाला म्हणून आणि मोठमोठ्या माणसांमध्ये, समाजातल्या व्यक्तींमध्ये स्पर्धा चालली होती, त्यांच्या शवाला खांदा देण्यासाठी. हे केशवरावांचे वैभव होते आणि आमच्या कपाळी आता काय लिहिलं आहे कुणास ठाऊक! चार माणसं तरी येतील की नाही याची मला शंका आहे.



**- बालगंधर्व**

*(लोकराज्य विशेषांक १९९०)*

# नमन...

संगीतसूर्य केशवराव भोसले यांच्या जन्माला ९ ऑगस्ट २०२० मध्ये १३० वर्षे पूर्ण झालीत तर ४ ऑक्टोबर २०२० पासून त्याचे स्मृति शताब्दी वर्ष सुरू होत आहे, या निमित्ताने माझे 'संगीतसूर्य केशवराव भोसले : आधुनिक मराठी रंगभूमीचा शिल्पकार' हे चरित्र प्रकाशित होत आहे, याचा मला अत्यानंद होत आहे. मराठी रंगभूमीवर सुवर्णाक्षरांनी लिहिला जावा, असा संगीतसूर्य केशवराव भोसले यांच्या कर्तृत्वाचा अध्याय उपेक्षा, दुर्लक्ष आणि असंवेदनशीलतेमुळे फारसा उजेडात येऊ शकला नाही, याची या प्रसंगी खंतही वाटते आहे. पण आपण लिहिलेल्या या चरित्रातून संगीतसूर्य केशवराव भोसले यांच्या व्यक्तिमत्वावर आणि कर्तृत्वावर पुरेसा प्रकाश पडू शकेल, याचे समाधानही आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ललित कला विभागात १९९० ते १९९६ या काळात मी पीएच.डी. साठी संशोधन कार्य करीत होतो. 'द ॲब्सर्ड थिएटरचा मराठी रंगभूमीवर प्रभाव' हा माझ्या संशोधनाचा विषय होता. त्या अंतर्गत मराठी रंगभूमीचा अभ्यास करताना 'संगीतसूर्य केशवराव भोसले' यांचा मला शोध लागला. बालगंधर्वांबद्दल मला माहित होते. त्यांच्या बद्दल भरभरून माहिती उपलब्ध होती. परंतु त्या तुलनेत केशवराव यांचेबद्दल फारच थोडी माहिती उपलब्ध होती. त्यांची खरेच उपेक्षा झाली, या निर्णयावर मी आलो होतो. पण १९९० मध्ये महाराष्ट्र शासनाचे मुखपत्र असलेल्या 'लोकराज्य'चा 'संगीतसूर्य केशवराव भोसले विशेषांक' प्रकाशित झाला. त्यातून भरपूर माहिती मिळाली. बरीच दुर्मिळ छायाचित्रे बघता आली. परंतु हा अंक म्हणजे बऱ्याच पूर्व प्रकाशित लेखांचा संग्रह असल्याचे लक्षात आले. त्यात स्वतंत्र लेखन फारच अत्यल्प प्रमाणात होते.

ही स्थिती लक्षात घेता छोटेखानी का होईना, स्वतंत्रपणे त्यांचे चरित्र लिहावे, असे मला वाटले. १९९६ ला मी नागपूरहून अमरावतीला आलो. आमचे मित्र, लेखक समीक्षक प्रा. प्रभाकर पावडे यांच्यामुळे मराठा सेवा संघाच्या संपर्कात आलो. शिवश्री पुरुषोत्तम खेडेकर साहेबांशी भेट झाली. माझी कला, सांस्कृतिक आणि साहित्य क्षेत्रातील धडपड बघून सेवा संघाच्या सांस्कृतिक कक्षाची जबाबदारी माझेवर त्यांनी सोपविली. या कक्षाचा विस्तार

करण्यासाठी त्याचे नामकरण 'संगीतसूर्य केशवराव भोसले सांस्कृतिक परिषद' असे करावे, असा प्रस्ताव मी त्यांच्यापुढे सविस्तर पध्दतीने ठेवला. त्यांनाही तो आवडला. त्यांनी होकार दिला आणि अमरावतीत या परिषदेचे रितसर काम १९९८ पासून सुरू झाले. केशवराव भोसले हे मराठा समाजातील असूनही, मराठा समाजाला सुध्दा त्यांचेबद्दल फारशी माहिती नव्हती. मग एक गायक, कलावंत, अभिनेता, ललितकलादर्श नाटक मंडळीचे मालक आणि बालगंधर्व यांच्या तोडीस तोड असलेले कर्तृत्व आणि व्यक्तिमत्व प्रकाशात आणण्यासाठी त्यांचे 'संगीतसूर्य' हे छोटेखानी चरित्र लिहिले. या कामासाठी तत्कालीन शिक्षण आणि सांस्कृतिक मंत्री रामकृष्ण मोरे सर आणि अर्थातच शिवश्री पुरुषोत्तम खेडकर यांनी खूप प्रोत्साहन दिले. २००४ मध्ये नभ प्रकाशन, अमरावतीच्या मिलिंद डहाके यांनी ते आकर्षक रुपात प्रकाशित केले. हे छोटेखानी चरित्र असले तरी त्यात फारशी नवीन काही माहिती नव्हती. उपलब्ध माहितीच्या आधारावर त्याची सिध्दता झाली होती.

'संगीतसूर्य केशवराव भोसले' यांच्याबद्दल आणखी नवी माहिती गोळा करून त्यांचे आणखी एक चरित्र लिहावे, अशी इच्छा होती. त्यादृष्टीने पुन्हा काही वर्षे तयारी सुरू होती. 'लोकराज्याचा संगीतसूर्य केशवराव भोसले विशेषांक' वगळता आणखी नव्या माहितीचा शोध घेतला. इंटरनेट, युट्यूब, फेसबुकचा आधार घेतला. गुगलवर बरीच माहिती शोधली. केशवराव भोसल्यांच्या समकालीनांचे चरित्र, समीक्षा ग्रंथ, मराठी रंगभूमीच्या इतिहासावर प्रकाश टाकणारे ग्रंथ चाळले. काही पीएच.डी. च्या प्रबंधांचा शोध घेतला. त्यातून जी काही नवीन माहिती पदरात पडली, त्या आधारावर या चरित्राची पुनर्बांधणी करण्याचा प्रयत्न मी केला आहे. तरीही असे वाटते की संगीतसूर्य केशवराव भोसले यांचेवर आणखी सखोल संशोधन होण्याची गरज आहे. त्या दृष्टीने आणखी प्रयत्न होत असेल तर ती निश्चितच आनंदाची बाब ठरेल. हे चरित्र लिहिताना 'लोकराज्य'चा दुर्मिळ अंक उपलब्ध करून देण्यासाठी 'लोकराज्य'चे संपादक आणि माझे मित्र सुरेश वांदिले, माजी जिल्हा माहिती अधिकारी अनिल गडेकर, नागपूरच्या जिल्हा माहिती अधिकारी श्रीमती शैलजा दांदडे, माझे मित्र, छायाचित्रकार आशीष यावले यांची मोलाची मदत झाली. संगीतसूर्य केशवराव भोसले सांस्कृतिक परिषदेच्या प्रदेशाध्यक्षा शिवमती वर्षा धाबे, 'स्कॅन डॉट'चे संचालक आणि माझे मित्र चद्रंकांत (सीडी) शिवणकर, प्रसिध्द संगीत दिग्दर्शक पंडित भोजराज चौधरी यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. या

सर्वांचा मी मनःपूर्वक आभारी आहे.

याशिवाय अशाही काही व्यक्ती आहे, ज्यांनी पडद्यामागे राहून या कामास प्रोत्साहन दिले, त्यांचेही मनःस्वी आभार.

'संगीतसूर्य केशवराव भोसले' यांचे हे चरित्र आपणास आवडेल, आपल्या माहितीत त्या माध्यमातून भर पडेल, असा विश्वास वाटतो आहे.

**- डॉ. सतीश पावडे**

दि. ४ ऑक्टोबर २०२०

(संगीतसूर्य केशवराव भोसले यांचा स्मृतिदिवस आणि स्मृति शताब्दी वर्ष)

**प्रस्तावना**

# एक सूर्य!
# एकमेव संगीतसूर्य



**ज्ञानेश महाराव**
संपादक चित्रलेखा

अभिनय क्षेत्रातील कलाकारांना 'स्टार' म्हणतात. 'स्टार'चा म्हणजे ताऱ्यांचा संबंध आकाशाशी! ताऱ्यांनी आकाश झगमगते, उजळते! पण हे तारे काय आणि त्यांच्यात उठून दिसणारा चंद्र काय, हे सगळेच परप्रकाशित! सूर्य मावळणार तेव्हा ते दिसणार! सूर्याच्या तेजाने प्रकाशमान होणार! असेच अमीट तेज केशवराव भोसले यांनी मराठी रंगभूमीला दिले; म्हणूनच त्यांची ओळख 'संगीतसूर्य' अशी झाली.

नारायणराव राजहंस उर्फ 'बालगंधर्व' यांच्या रुपात मराठी रंगभूमीवर 'गंधर्वयुग'च अवतरले. छोटागंधर्व, कुमारगंधर्व, भूगंधर्व, देवगंधर्व, डिट्टोगंधर्व अशी भली मोठी गंधर्व मालिका आहे. पण 'संगीतसूर्य' एकच! आणि ही ओळख मृत्युला १०० वर्ष होत आली, तरीही टिकवून ठेवणारे केशवराव भोसलेही एकमेव!

सूर्य पाहता आणि अनुभवता येतो; पण त्याला पकडता येत नाही. त्यावर चंद्रायानाची मोहिम आखून स्वारही होता येत नाही. 'संगीतसूर्य' केशवराव भोसले याचेही असेच आहे. केशवराव ऐकता येतील; पण ऐकवता येणार नाहीत! सांगता येतील; पण शब्दात पकडता येणार नाहीत! हे ठाऊक असूनही नाट्य-संगीत विश्लेषक डॉ. सतीश पावडे यांनी केशवराव भोसले यांना चरित्ररूपात सादर करण्याचा निश्चय केला आणि केशवरावांची थोरवी कशात आहे, ते

नेमक्या शब्दात मांडले आहे. यातून केशवराव होता येणार नाही. पण त्यांचे अढळ 'सूर्य'पण घेता-घेता चंद्रासारखं नक्कीच प्रकाशता येईल! इथे महात्मा ज्यातीराव फुले यांच्या अखंडातील ओळी आठवतात -

**एक सूर्य सर्वा, प्रकाश हो देतो -**

**उद्योगा लावितो, सर्व जीवा -**

कलाकाराने 'स्टार' म्हणून चमकण्यापेक्षा 'सूर्य' होण्याची धमक दाखवावी, कलेची उंची वाढवावी, हेच केशवराव भोसले यांची कलाकीर्ती सांगते. हे नीटपणे समजून सांगण्याचे सारे श्रेय डॉ. सतीश पावडे यांच्या अभ्यासपूर्ण लेखनाला आहे.



: छायाचित्र सौजन्य :
अजय एस. मांजरेकर



**बाल केशवराव भोसले (वय ४ वर्षे) गुरुवर्य दत्तोपंत जांभेकर आणि तबलानवाज भाष्करराव चौगुले यांचे सोबत**

# जन्म आणि बालपण

**सं**गीतसूर्य केशवराव भोसले मराठी संगीत रंगभूमीवर होऊन गेलेले एक महान अभिनेता आणि गायक कलावंत होते. त्यांच्या एकूण व्यक्तिमत्वाचा आणि कर्तृत्वाचा अभ्यास केला तर त्यांचे असामान्यत्व तात्काळ नजरेत भरते. एक कलावंत आणि एक माणूस म्हणून, एक अजबच रसायन म्हणून गौरवाने त्यांचा उल्लेख करावा लागेल. केवळ एकतीस वर्षांच्या आयुष्यात त्यांनी मराठी संगीत रंगभूमीवर नेत्रदिपक अशी कामगिरी केली आहे. आपल्या नाट्यकर्तृत्वाने कला-साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात आपले अढळ स्थान त्यांनी निर्माण केले आहे. अत्यंत विपरीत परिस्थितीत बालगंधर्व सारखा प्रतिस्पर्धी समोर असताना एकलव्याच्या निष्ठेप्रमाणे गाण्याने आपले स्वत:चे अस्तित्व सिध्द करून दाखविले. स्पर्धक आणि विरोधकांकडूनही मान्यता मिळवून दाखविली. प्रवाहाच्या विरोधात

पोहून जिद्दीने यश, किर्ती आणि संपत्ती संपादित केली.

संगीतसूर्य केशवराव भोसले यांचा जन्म ९ ऑगस्ट १८९० रोजी सकाळी दहा वाजता घर नं. २२८०, तस्ते गल्ली, मंगळवारपेठ, कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील विठ्ठलराव भोसले हे सोपानगडचे गडकरी होते. वैद्यकी विद्येचा अभ्यास करता करता त्यांना किमया, जादू-टोणा करण्याचा नाद लागला. त्यात ते आपले सारे वर्चस्व गमावून बसले. त्यातच एके दिवशी त्यांना आपला जीवही गमवावा लागला. केशवरावांचे आजोबा सटवाजीराव भोसले हे सुध्दा आधी सोपानगडचे गडकरी होते. १८५७ च्या बंडात ते धारातीर्थी पडले होते. असा क्षत्रियत्वाचा आणि वीरतेचा वारसा त्यांना मिळाला होता. परंतु वडिलांच्या नादिष्ट आणि आत्मघातकी वर्तनामुळे त्यांना बालपणीच दारिद्र्य भोगावे लागले. खरे तर त्यांची आई जनाबाई या कागलच्या सुभेदार घराण्यातील होत्या. पण विठ्ठलराव भोसलेंच्या दुष्कृत्यामुळे त्यांना निराधार व्हावे लागले.

तीन मुले आणि एक मुलगी यांच्या उदरनिर्वाहासाठी कोल्हापुरच्याच स्वदेशहितचिंतक नाटक मंडळीत स्वयंपाक-भांडी, झाडझूडीचे काम त्यांना पत्करावे लागले. दोन वेळच्या जेवणाचा प्रश्न येथे सुटला होता पण दारिद्र्याने पिच्छा सोडला नव्हता. या परिस्थितीत मात्र स्वदेशहित चिंतक नाटक मंडळीचे वातावरण केशवरावांच्या जडणघडणीसाठी उपयुक्त ठरले. किंबहुना कलेचे संस्कारच या मंडळीने केशवरावांवर वयाच्या तिसऱ्या वर्षापासून केले होते. बालपणापासून त्यांना रंगभूमीवर काम करण्याची संधी मिळत गेली. प्रारंभीच्या काळात त्यांना 'तरुणी शिक्षण' या नाटकात 'पोऱ्या' आणि 'बाजीराव मस्तानी' या नाटकात 'पोरसवदा' समशेर बहाद्दरची तसेच 'राजाराम' या नाटकात 'बाल शाहूची' भूमिका मिळाली. या शिवाय 'मृच्छकटीक' नाटकात चेट आणि 'शांकुतल' नाटकात प्रियंवदेची भूमिका ते करीत. 'प्रबल योगीनी' या नाटकात पहिली बाल स्त्री भूमिका म्हणजे चंदेची भूमिका करण्याची संधी त्यांना मिळाली. अर्थात् या भूमिका अत्यंत दुय्यम स्वरुपाच्या होत्या. असे असले तरी रंगभूमीवर त्यांचा प्रवेश या पध्दतीने बालवयातच झाला.

योगायोगाने म्हणा किंवा अपघाताने म्हणा, गो.ब. देवलांच्या 'संगीत शारदा' या नाटकातील मुख्य नायिकेची भूमिका त्यांच्या पदरात पडली. केशवरावांनीही त्या संधीचे सोने केले. ही भूमिका नेहमी करणारा कृष्णा देवळी हा कलावंत आजारी पडल्याने ही भूमिका त्यांना मिळाली होती, ही एक ऐतिहासिक घटना होती. 'मूर्तिमंत भिती उभी' या पदाने केशवरावांनी प्रेक्षकांची पसंती नट आणि

गायक म्हणून मिळवली. शारदेची भूमिका केशवराव करीत तेव्हा त्यांचे वय जेमतेम दहा वर्षांचे होते. १९०० मध्ये बार्शी येथील मुक्कामात ही संधी त्यांना मिळाली होती. वयाच्या चौथ्या वर्षापासूनच त्यांना त्यांच्या नाटक मंडळीचे मालक जनुभाऊ निमकर यांनी संगीत, अभिनयाचे प्रशिक्षण देणे सुरू केले होते. त्याचा लाभ केशवरावांना मिळाला. शारदा नाटकापासूनच बाल नट म्हणून त्यांना ख्याती मिळणे सुरू झाले होते. 'संगीत शारदा' हे नाटक त्यांच्यामुळे खूप लोकप्रिय झाले. किर्लोस्कर मंडळी करीत असलेल्या शारदा नाटकाच्या प्रयोगांपेक्षा केशवराव भूमिका करीत असलेले शारदा नाटक चांगले होत असे, अशी पावती खुद्द गो.ब. देवलांनी सुध्दा दिली होती. या नाटकात शारदेला २० पदे होती. इतक्या लहान वयातही केशवराव ते उत्तमपणे गात असे. बार्शीच्या पहिल्या प्रयोगाला 'मूर्तिमंत भिती उभी' या पदाला १२ वेळा 'वन्समोर' मिळाल्याचा रेकॉर्डही केशवरावांच्या नावावर आहे.

●●●



जन्मस्थळ : घर नं. २२८०. तस्ते गल्ली, मंगळवार पेठ, कोल्हापूर



**स्वदेश हितचिंतक नाटक मंडळीच्या शारदा (१९००) नाटकातील वल्लरीच्या भूमिकेत केशवराव (डावीकडून तिसरे)**

# संघर्षमय कारकिर्दीचा प्रारंभ

संगीतसूर्य केशवराव भोसले आणि त्यांचे बंधू दत्तोबा भोसले हे स्वदेशी हितचिंतक नाटक मंडळीत आघाडीचे नट बनले. मंडळीच्या वाट्यात मात्र त्यांना समाधानकारक हिस्सा मिळत नव्हता. अत्यल्प वेतनावर, तुटपुंज्या कमाईवर त्यांना दिवस काढावे लागत होते. खरे तर मंडळीच्या उत्पन्नात आणि यशात त्यांचे मोठे योगदान होते. वेतनवाढीच्या मुद्यावरून त्यांना वारंवार अपमानित व्हावे लागत असे. यामुळे एके दिवशी वाटाघाटीचे सर्व मार्ग बंद झाल्यावर दोन्ही भावांनी स्वदेशी हितचिंतक नाटक मंडळी सोडण्याचा निर्णय घेतला. दारिद्र्याच्या शापांची सोबत घेऊन त्यांनी आपली नवी कारकीर्द सुरू केली होती, पण अजूनही त्यांचे दारिद्र्य संपत नव्हते. अखेर त्यांनी १ जानेवारी १९०८ रोजी हुबळी येथे स्वतःची 'ललितकलादर्श नाटक मंडळी' स्थापन करून स्वदेशी हितचिंतक मंडळीला कायमचा निरोप दिला. रामभाऊ दोंदे यांचे 'ऋतुध्वज मदालसा' हे ललितकलादर्शचे पहिले नाटक. त्याचा पहिला प्रयोग १९११ मध्ये विदर्भातील आकोट येथे झाला.

तुटपूंजी साधने, आर्थिक चणचण, कलावंतांची कमतरता, गाजलेल्या प्रतिष्ठीत

नाटककारांचा असहकार याचेशी संघर्ष करीत ते जिद्दीने काम करीत राहीले. मालक असूनही मालकपणा सोडून पडेल ती कामे ते उत्साहात आणि हार न मानता करीत. जेवणासाठी ताटे नसणे, कपबशा नसणे हे अनुभव ते घेत होते. त्यांच्या व त्यांच्या सहकाऱ्यांना द्रोणातून चहा प्यावा लागे. सतरंज्या उचलणे, रंगमंचाची सजावट करणे, प्रसंगी झाडूपोछा करण्याचे कामही ते करीत. पण 'शो मस्ट गो ऑन' यावर त्यांची श्रध्दा होती. रंगमंचीय निष्ठेला त्यांनी कधी ढळू दिले नाही. त्यावेळी त्यांचे वय केवळ १८ वर्षांचे होते. 'ललितकलादर्श' ही २१ मालकांची नाट्य मंडळी होती. इतके मालक असणारी नाटक मंडळी चालविणे म्हणजे तारेवरची कसरत होती. परंतु काही काळ ही कसरतही त्यांनी केली. प्रचंड संघर्ष करीत आपले व आपल्या नाटक कंपनीचे हित त्यांनी साधले.

केशवराव मुळातच अतिशय जिद्दी स्वभावाचे होते, पण ही जिद्द सकारात्मक होती, नवनवोन्मेशसाली होती. ते प्रचंड परिश्रमी होते. गुण ग्राहकता, दुरदृष्टी, कल्पकता, प्रयोगशिलता, आवश्यक व्यवहारिकपणा त्यांच्यात होता. समर्पित भावनेने, एकनिष्ठेने ते आपले काम करीत. त्यामुळे एक मनस्वीपणा त्यांच्या स्वभावात निर्माण झाला होता. कलंदर आणि अवलियावृत्ती त्यांच्यात होती. ते ध्येयवेडे होते. बुध्दीने चौकस, तल्लख होते. उदारपणा, संवेदनशिलता, परोपकारीवृत्ती त्यांच्या स्वभावात होती. ते उत्कृष्ट गायक, अभिनेता, संघटक, संयोजक, व्यवस्थापक, निर्माते होते. नवनवीन आव्हाने स्विकारणे आणि ती पूर्णत्वास नेणे हा त्यांचा बाणा होता. गुणग्राहकता तर त्यांच्या स्वभावांचा विशेष होता. आत्मपरीक्षण करण्याची त्यांना सवय असल्याने आपल्या चुकांवर त्यांनी कधी पांघरुण घातले नाही. ते स्वाभिमानी होते. प्रयोगशील आणि अभ्यासू वृत्तीमुळे त्यांनी अनेक नवीन प्रयोग रंगभूमीवर सादर केले. नशिबापेक्षा कर्मवादाला ते अधिक महत्व देत. ते श्रध्दावान असले तरी अंधश्रध्द नव्हते. प्रयत्नवादाचे तर मूर्तिमंत प्रतिक होते. त्यांना नाविण्याची हौस होती. ते सामाजिक बंधिलकी मानत. आपण समाजाचे देणे लागतो, त्यावर त्यांचा विश्वास होता. व्यावहारिक शिस्ती सोबत नैतिकेलाही त्यांनी नेहमीच महत्व दिले. असाध्य ते साध्य करण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती त्यांचेजवळ होती. अनुभव आणि ध्येय प्राप्तीच्या प्रयत्नांमुळे त्यांच्या महत्वाकांक्षा आकाशाला गवसणी घालत. एकूणच ते प्रचंड ऊर्जावान रंगकर्मी होते.

●●●



**मालक, गायक, नट म्हणून लोकप्रियता मिळविणारे**
**केशवराव भोसले, वय वर्ष १८**

# केशवाय नमः

**सं**गीतसूर्य केशवराव भोसले यांनी बाजीराव मस्तानी, तरुणी शिक्षण, राजाराम, प्रबल योगीनी, मुद्रिका, संस्कृत शांकुतल, मृच्छकटिकम् या नाटकात बाल भूमिका केल्यात. याशिवाय रामराज्य वियोग, संशय संभ्रम, हरिश्चंद्र, अक्षविपाक, शाप संभ्रम, मूकनायक, चंद्रहास, दामिनी, मोहना, सौभद्र, संयुक्त सौभद्र, मानापमान, संयुक्त मानापमान, शहा शिवाजी, राक्षसी महत्वाकांक्षा, हाच मुलाचा बाप, संन्याशाचा संसार, श्री, संगीत शारदा, संगीत गोपीचंद, ऋतूध्वज मदालसा इत्यादी नाटकात त्यांनी भूमिका केल्यात. यापैकी शारदा, मूकनायक, मदालसा, राक्षसी महत्वाकांक्षा, सौभद्र, शहा शिवाजी, दामिनी आणि मानापमान या नाटकातील त्यांच्या भूमिका खूप गाजल्या. याशिवाय शीघ्र सुधारणा दुष्परिणाम, चंद्रसेना, विद्याहरण, व्रतपालन, कमाले हिर्स (उर्दू) आदी संगीत नाटकात भूमिका केल्याचेही संदर्भ आढळतात. केशवरावांनी ३१ वर्षात ५२ भूमिका केल्यात. एक आगळा वेगळा प्रयोग म्हणून 'कमाले हिर्स' या उर्दू नाटकाचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

अभिनय, गायन, दिग्दर्शन याशिवाय संगीत शहा शिवाजी या नाटकासाठी त्यांनी तीन पदेही लिहिली. त्याचप्रमाणे सौभद्रमधील 'बहूत छळीयले', 'शाकुंतल'मधले 'मना तळमळशी', मूकनायक मधील 'अवचित गेले', रामराज्य

वियोगमधील 'मन माझे भडकूनी गेले', शारदा मधील 'मूर्तिमंत भिती उभी' ही पदे तर खूप गाजली. एवढेच नव्हे तर या सह पांडुनृपती जनकजया (सौभद्र), मी समजू तरी काय? (शारदा), 'पुष्प पराग हे' (सौभद्र), 'होय हा संसार' (मूकनायक), धन्य जाहला माझा राम (राम राज्य वियोग) या पदांच्या ध्वनिमुद्रिका रेकॉर्ड झाल्याचेही संदर्भ मिळतात. पण आज या ध्वनिमुद्रिका उपलब्ध नाहीत. मात्र आजही युट्यूबवर 'मुकनायक' नाटकातील दोन नाट्यगीते 'अवचित गेले किंकर करि...' आणि 'होय हा संसार' उपलब्ध आहेत, ते आपण ऐकू शकतो, त्यात पिलु, पिलु खमाज, मिश्र पिलु, आरभी, तिलक कामोद, जौनपुरी, मिश्र राग रूप, भीमपलास, भैरवी आदी रागांचा उपयोग त्यांनी केला आहे.

श्री. शरद पवार हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना १९९० मध्ये महाराष्ट्र शासनाचे मुखपत्र असलेल्या 'लोकराज्य' मासिकाने 'संगीतसूर्य केशवराव भोसले विशेषांक' प्रकाशित केला होता. या अंकासाठी शुभेच्छा व्यक्त करतांना ते म्हणाले, "केशवरावांनी महाराष्ट्राची सांस्कृतिक भूमी समृध्द केली. मराठी संगीत रंगभूमीला वैभवाच्या शिखरावर पोचविले. ते एक परिपूर्ण कला-साधक होते. त्यांनी रंगभूमीला आधुनिकतेची दिशा देण्याचा प्रयत्न केला. केशवरावांचे गाणे म्हणजे संगीत रंगभूमीच्या सोनेरी मुकुटातील कौस्तुभ होते. अभिनय आणि गायन याद्वारे मराठी संगीत रंगभूमीला त्यांनी आपल्या अल्पायुष्यात समृध्द केले आणि जणू इतिहासात एक सोनेरी पान लिहिले. मराठी रंगभूमीला ललामभूत ठरलेले ते एक महान कलावंत होते. 'संगीतसूर्य' ही उपाधी रसिकांनी त्यांना उत्स्फूर्तपणे बहाल केली होती." त्यांच्या या महान कार्याचा गौरव शरद पवार यांनी संगीत रंगभूमीच्या सोनेरी मुकुटातील 'कौस्तुभ' असा केला आहे, त्याचप्रमाणे अरुण गुजराथी त्यांचा उल्लेख 'मराठी रंगभूमीवरील अनुपम लेणे' म्हणून करतात. बाबुराव देशपांडे त्यांना 'झपाटलेला अवलिया' म्हणतात. शाहू महाराजांनी त्यांचा सन्मान 'तळपती तलवार' या शब्दात केला आहे. विद्याधर गोखले त्यांचा उल्लेख 'नटराजाचे भवानी खड्ग' असा करतात. संशोधक त्यांची नोंद 'आधुनिक मराठी रंगभूमीचा शिल्पकार' म्हणून घेतात. अनेक लेखकांनी त्यांना 'मराठी नाट्यदेवतेचा मुकुटमणी' म्हटले आहे. मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर यांनी त्यांचा उल्लेख 'कर्तबगार नट' म्हणून केलेला आहे. तर त्याकाळच्या काही प्रेक्षकांनी त्यांना 'गंधर्वाचा गंधर्व' सुध्दा म्हटले आहे. यावरून संगीतसूर्य केशवराव भोसले यांचे कर्तृत्व आपल्या लक्षात येऊ शकेल.

●●●



**गायकी आणि अभिनयाचा चरमोत्कर्ष : संयुक्त मानापमान**

# गायकी आणि अभिनय

**गा**नसम्राट अल्लादिया खाँ साहेब, गुरुवर्य जांभेकर बुवा, गुरुवर्य वझे बुवा यांच्या तालमीत केशवरावांनी संगीत साधनेचा प्रारंभ केला. अभिजात आणि नाट्यसंगीत या दोन्ही क्षेत्रातील विशेष गायकीसाठी केशवरावांनी अथक परिश्रम घेतले आणि त्यातूनच त्यांची गायकी समृध्द झाली. अभिनय प्रशिक्षणाचा वारसा त्यांना स्वदेश हितचिंतक नाटक मंडळीचे मालक जनुभाऊ निमकर आणि वडील बंधू दत्तोबा भोसले यांचेकडून मिळाला. वयाच्या चौथ्या वर्षापासून संगीत आणि अभिनय कलेला ते समर्पित झाले होते. त्याची चुणूक त्यांनी वयाच्या १० व्या वर्षी संगीत शारदा नाटकात शारदेची अजरामर भूमिका करून दाखविली होती. आपला अभिनय आणि गायकी आणखी समृध्द करण्यासाठी ते दहा-दहा तास तालीम करीत. त्यामुळे सातत्याने प्रयोग करणे, नाविण्याचा शोध घेणे हा त्यांचा स्वभाव बनला होता. संगीत आणि अभिनयात ते नेहमीच 'इंप्रोवाईजेशन' (कल्पना विस्तार) करीत. कल्पक आणि सर्जनशिलतेने त्यांची कला बहरली होती. समय सूचकता, प्रसंगावधान, प्रेक्षकांची मानसिक अवस्था बघून ते या प्रयोगांचे सादरीकरण करीत. विद्युलतेप्रमाणे अशी कृती ते नाटक सुरू असतांना रंगमंचावर करीत. पण त्यातून रस पोषणच व्हावे, याची ते काळजी घेत.

भाषेवर, भाषेच्या उच्चारावर त्यांचे प्रभुत्व होते. मग ती मराठी, हिंदी, संस्कृत असो की उर्दू. म्हणूनच त्यांचे संवाद हे प्रेक्षकांनाही लवकर पाठ होई. भाषेवरील प्रभुत्व मिळविण्यासाठीही ते अभ्यास, तालीम करीत. प्रसंगी त्या भाषेच्या विद्वानांकडून मार्गदर्शन घेत. केशवरावांची गायकी तडफदार होती. त्यांचा आवाज उंच आणि खडा होता. पण स्त्री-पुरुष भूमिकेनुसार ते आपला आवाज वाकवायचे आणि वळवायचे. जे शारदा नाटक त्यांनी गाजवले त्याच शारदा नाटकात काही काळानंतर त्यांनी कोदंडाचीही भूमिका केली आणि गाजविली सुध्दा. कोदंडाच्या भूमिकेचा टणत्कारही प्रेक्षकांनी डोक्यावर घेतला होता, इतकी अप्रतिम भूमिका त्यांनी कोदंडाचीही केली होती. अशाप्रकारे संगीत आणि अभिनय हे दोन्ही प्रांत त्यांनी गाजविले. म्हणूनच रामजी जोशी यांनी त्यांना 'मराठी रंगभूमीचे चार चांदाचे सरदार' म्हटले आहे. मुळात केशवरावांची गायकी ही ख्याल गायकी होती. ग्वाल्हेर घराण्याचे शास्त्रशुध्द शिक्षण त्यांनी घेतले होते. त्यांच्या गायकीत भारदस्तपणा आणि खानदानीपणा होता. रामजी जोशी यांनी त्यांच्या गायकीचे वर्णन पुढील प्रमाणे केले आहे. "तीन सप्तकात फिरणारी निकोप व सहज तान व शास्त्रप्रणीत तानेचे जे प्रकार म्हणजे गुंफणीची, फिरकीची अशा विविध प्रकारच्या ताना ते विद्युलतेच्या चपळाईने व गतीने घेत असत." एकूणच त्यांच्या तानांची वारंवारिता (फ्रिक्वेंसी) आश्चर्यकारक होती. मुळातच केशवरावांची तान हेच त्यांचे बलस्थान होते. पांढरी पाच पट्टीचा हा आवाज रुंद आणि स्वर भारदस्त होते. एकूणच त्यांची संगीत कला समृध्द अशी होती.

संगीतसूर्य केशवराव भोसले यांनी स्वतःची अशी आगळीवेगळी शैली निर्माण केली होती. त्यात कौशल्य, कसब आणि चमत्कृतीचा उपयोग केला. आलापी पेक्षा तानक्रियेचा अधिक उपयोग केला. नाट्यगीत गातांना सोळा मात्रांच्या तालात आवर्तनांना अधिक महत्व दिले. त्यांची गायन शैली ही 'अष्टांग गुण' युक्त होती. संगीत शास्त्रानुसार हे 'अष्ट अंग' महत्वाचे मानले जाते. रामजी जोशी यांनी केशवरावांच्या गायन शैलीचे विस्तृत वर्णन केले आहे. ते म्हणतात, "तानक्रियेच्या प्राधान्यासह अष्टगुण मंडित आणि अत्यंत प्रभावशाली असा आविष्कार घडविणारी एक स्वतंत्र गायन शैली 'भोसले घराणे' या नावाने प्रस्थापित केली. केशवराव यांची गायकी म्हणजे स्त्री-पुरुष अशा दोन्ही भिन्न प्रवृत्तीची नाट्यगीते ते सारख्याच सामर्थ्यानिशी गात. ही किमया नटसम्राट बालगंधर्वांबद्दल पूर्ण आदर ठेवून सुध्दा, त्यांना साध्य झाली

नाही, हा इतिहास आहे. एकूणच केशवरावांचा गायकी संचार हा चौफेर होता.'' केशवराव हे स्वयंसिध्द कलावंत होते. त्यांनी स्वत:ची अशी स्वतंत्र वाट चोखाळाली होती. जे-जे आवडेल तसेच जे-जे उपयोगी होईल, ते-ते निवडून आत्मसात करून त्यांनी संगीत नाट्यशैलीवर आपली स्वतंत्र अशी नाममुद्रा उमटविली होती. श्री. अरुण गुजराथी म्हणतात त्या प्रमाणे - ''केशवराव भोसले यांनी एकलव्याच्या निष्ठेने संगीताचे शिक्षण घेतले. त्यांच्या इतकी गवई गायकी मराठी रंगभूमीवर कोणीही आत्मसात केलेली नव्हती. पुरुषी भूमिका असो की स्त्री भूमिका, त्यांनी एकाच ताकदीने वठविल्या. मराठी रंगभूमीवर त्यांनी एक गौरवशाली पर्व निर्माण केले.'' संगीतसूर्य भोसले हे काही तसे 'बॉर्न' कलावंत नव्हते पण आपल्या जिद्दीने, समर्पणवृत्तीने, अभ्यासू, प्रयोगशील आणि महत्वाकांक्षेतून घडलेले कलावंत होते. त्यांनी आपल्या प्रयत्नवादातून या गौरवशाली पर्वाची निर्मिती केली होती.

●●●



**स्त्री भूमिकेतील बालगंधर्व**



**अष्टपैलू, हरहुन्नरी, महत्वाकांक्षी व्यक्तिमत्वाचे धनी**

# महत्वाकांक्षी व्यक्तिमत्व


**गा**यन कलेप्रमाणेच त्यांनी आपली अभिनयशैली सुध्दा त्याच प्रकारे विकसित केली होती. त्यांच्यात सौंदर्य, नाजुकता, उंची याची उणिव आहे, याची त्यांना जाणिव होती. त्यावर मात करीत आपल्या अभिनयाला आणि गायकीलाही समृध्द केले. जोरकस संवाद, डोळ्यांचा अनुरूप वापर, आवाजाचा अनुकूल उपयोग ते करीत. भूमिका समजून घेणे, त्यावर परिश्रम घेणे, स्वतःच्या अभिनयाला पूरक जागा निर्माण करणे, स्वतःच्या उंचीच्या मर्यादेवर मात करण्यासाठी इतर क्लुप्त्यांचा उपयोग करणे आदी प्रयोग ते करीत. उदा. संयुक्त मानापमानात त्यांनी उंची वाढविण्यासाठी उंच टाचेचे बूट वापरले. कोल्हापूरी पध्दतीचा तुरेवाला फेटा घातला. आगमन-निर्गमनात वेगळ्या चपळाईचा उपयोग केला. भरताच्या नाट्यशास्त्रात वर्णित चतुर्विध म्हणजेच आंगिक, वाचिक, आहार्य आणि सात्विक पध्दतीच्या अभिनयाचा ते पूर्ण उपयोग करीत. अभिनयासाठी आवश्यक निरीक्षण क्षमता, अनुकरण क्षमता, कल्पनाशिलता, लक्ष केंद्रीकरण करण्यासाठी आवश्यक संयम, भूमिकेचा अभ्यास, अभिनयाची तालीम, दमसाजासाठी व्यायाम, प्रयोगशिलता, सर्जनशिलता,

प्रभावोत्पादकता त्यांच्याजवळ होती. आजच्या भाषेत ज्याला 'पध्दतीबध्द अभिनय' अर्थात 'मेथड ॲक्टींग' म्हणतात, त्यावर त्यांची पकड होती. सर्वात महत्वाचे म्हणजे प्रेक्षकांची नाडी त्यांनी पकडली होती. म्हणजे नट आणि प्रेक्षकांचे मानसशास्त्र त्यांना अवगत होते. भूमिका कोणतीही असो, लहान असो किंवा मोठी ते समरसून ती भूमिका करीत. अनेक नाटकात तर त्यांनी चार-पाच वेगवेगळ्या भूमिका केल्या आहेत. पण नट म्हणून त्यांचे 'बेअरिंग' त्यांनी कधी ढळू दिले नाही. असे असले तरी स्त्री भूमिकेसाठी असणाऱ्या मर्यादा बघता पुढे त्यांनी स्त्री भूमिका करणे कमी केले. पुरुष भूमिकेत असणाऱ्या आक्रमक अभिनयशैलीचा, गायनशैलीचा ते पुरेपूर उपयोग करून घेत. संयुक्त मानापमान नाटकात बालगंधर्व भामिनीच्या रूपात पुढे उभे असतानाही धैर्यधराच्या भूमिकेत त्यांनी सात-सात 'वन्समोर' घेतले होते. विद्याधर गोखले म्हणतात, "आक्रमक मर्दानी गायकी मानापमानात त्यांना अधिक शोभून दिसली आणि प्रेक्षकांनाही ती आवडली." मुळातच त्यांच्या अभिनयात हा भारदस्तपणा होता. स्वभावाच्या व्यक्तिरेखा हेरून ते अभिनय फुलवित आणि आपली पदेही रंगवित.

१९१० पासून बालगंधर्व युग सुरू झाले. या काळात ते लोकप्रियतेच्या उत्तुंग शिखरावर होते. त्याच काळात केशवराव भोसले यांनी आपली नाटके त्यांच्या तोडीस तोड गाजवली. बालगंधर्वांच्या मानापमान आणि विद्याहरण सारख्या लोकप्रिय नाटकांच्या स्पर्धेत आपल्या अभिनय आणि गायकीच्या जोरावर वीर वामनराव जोशी यांचे 'राक्षसी महत्वाकांक्षा' हे नाटक यशस्वी करून दाखविले. प्रयोग आणि उत्पन्नाचा नवा रेकॉर्डही निर्माण केला. आव्हान स्विकारणे आणि ते पूर्णत्वास नेणे, हा त्यांचा उपजतच स्वभाव होता. राक्षसी महत्वाकांक्षेत ते एकटेच २४ पदे गायचे. त्यात कितीतरी पदांना 'वन्समोर' मिळत असे. वरेरकरांच्या 'संन्यासाचा संसार' या नाटकात त्यांनी प्रथमच 'बाटग्या डेव्हीडची' भूमिका केली. खरे तर ही भूमिका त्यांच्या प्रकृतीला साजेशी नव्हती. पण आपल्या अभिनय कौशल्यावर आणि या भूमिकेला साजेशा गायकीवर त्यांनी ही भूमिका गाजवली. 'अरे बा पांडूरंगा' या पदावर तर प्रेक्षकांना ते चक्क रडवित असे. इतका हुकमी अभिनय ते करीत. एकदा भूमिका निश्चित झाली की ते आपल्या पातळीवर भूमिकेसाठी संशोधन करीत. वेशभूषा, केशभूषा ठरवित. संवादांचा स्वतंत्र अभ्यास करीत. गायकीचा रियाझ करीत. नटाला लागणाऱ्या अविकल्प एकाग्रतेचा ते ध्यास धरीत.

डोळ्यांचा प्रभावी उपयोग, आवाज आणि श्वासातील सुसूत्रता, रंगमंचावरील वावर, हँड प्रापर्टी, स्टेज प्रापर्टीचा उपयोग ते कलात्मक पध्दतीने करीत. गायन आणि अभिनयासाठी नव्या 'तरकिबा' शोधणे आणि त्याचा यशस्वी उपयोग करणे, यात त्यांची हातोटी होती. मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर म्हणतात, "केशवरावांच्या आवाजात फारशी गोडी नव्हती आणि त्यांच्या गाण्यात सहजताही नव्हती. पण अत्यंत मेहनतीने त्यांनी आपल्या आवाजात इतका कणखरपणा आणला होता की, थिएटर अथवा मजलसीत त्यांच्या आवाजाची छाप पडून त्यांचे गाणे श्रोतृ समाजाच्या कानात घुमे. त्यांच्या तानामध्येही बरीच चमत्कृती असल्याने श्रोत्यांना थरारल्यासारखे वाटत असे. महत्वाकांक्षा हा गुण त्यांच्यामध्ये विशेष असल्यामुळे अमूक एक गोष्ट करायची, अमूक एक पद जोरकस गाऊन वन्समोअर मिळवायचा, अमक्याशी गाण्यात स्पर्धा करायची असा जर त्यांनी निश्चय केला तर ते जिवाचे रान करून तडीस नेत." असा हा त्यांचा स्वभावच होता. नट, गायक म्हणून मान्यता मिळविण्याचे आव्हान स्विकारून जिवाचे रान करीत, ती मान्यता त्यांनी मिळवलीच. गान सम्राट अल्लादिया खाँ साहेब, विष्णू दिगंबर पालुस्कर, भास्करबुवा बखले, गो.ब. देवल, गोविंदराव टेंबे, गणपतराव बोडस, गणपतराव जोशी, केशवराव भोळे. न.चि. केळकर आणि खुद्द बालगंधर्व यांचेकडूनही त्यांनी वाहवा मिळविली. शाहू महाराजांचा तर त्यांचेवर विशेष लोभ होताच.

●●●



**कोल्हापूर येथील तत्कालीन पॅलेस थिएटर**



**सामाजिक बांधिलकीतून नाटकांच्या विषयाची निवड**

# सामाजिक बांधिलकी

**सा**माजिक बांधिलकी, समाजसेवा महत्वाची मानणारे कलावंत म्हणून केशवरावांचा अग्रक्रमाने विचार करावा लागेल. सामाजिक विषय नाटकांसाठी निवडणे, सामाजिक उपक्रमांना दान देणे, उपेक्षित कलावंतांना संधी देणे ही कामे त्यांनी उत्स्फूर्तपणे केली आहेत. आपण समाजाचे देणे लागतो, ही त्यांची अंतर्प्रेरणा होती. अनाथालयांना आर्थिक मदत ते करीत असत. अमरावती मराठी परिषद, कोल्हापूरचा देवल क्लब, धुळे येथील नाट्य रसिक क्लब, हैद्राबादचा शंकर दरबार, पुणे मराठी ग्रंथ संग्रहालय, सांगलीचे दत्त मंदिर, इंदूरचे ऑडिटोरीयम, बेळगावचे गणेश विद्यालय, कोल्हापूर येथील अनेक व्यायामशाळा, तालमींना मुक्त हस्ताने आर्थिक मदत केल्याचे दाखले सापडतात. ते परोपकारी वृत्तीचे होते. कृतज्ञता त्यांच्या स्वभावाचा विशेष होता. ललितकलादर्श मंडळीत त्यांनी सर्वांना समान वागणूक दिली. जातीभेद, अस्पृश्यता, शिवाशिव, सोवळे यांना मज्जाव केला. मंडळीतील सर्वच लोकांना एकाच पंगतीत ते जेवायला बसवत. कुठल्याही भेदभावाला त्यांनी कधी थारा दिला नाही. शिक्षणासाठीही ते अनेक विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करीत. स्वातंत्र्य लढ्यासाठी ते सातत्याने आर्थिक रसद स्वातंत्र्य सैनिकांना पुरवित. कंपनीच्या मालकी संदर्भात लोकशाही पध्दतीचा 'ट्रस्ट डीड' त्यांनी करून ठेवला होता. नाटक

मंडळीतील कुणाचेही नुकसान होऊ नये, कुणावर अन्याय होऊ नये याकडे ते जातीने लक्ष पुरवित असे. बालगंधर्वांवर जेव्हा कर्जाचे प्रचंड ओझे झाले होते, तेव्हा संयुक्त प्रयोग करून कर्जमुक्त होण्याचा प्रस्ताव त्यांनी स्वतःहून बालगंधर्वांकडे ठेवला होता.

त्यांनी नाटकांसाठीही सामाजिक विषयांचीच विशेष निवड केली होती. नाटकातून प्रेक्षकांचे मनोरंजन तर व्हावे पण त्यांचे प्रबोधनही व्हावे, असे त्यांना वाटत असे. ललितकलादर्श स्थापन केल्यावर त्यांनी सामाजिक समस्यांवर आधारित नाटके लिहून घेतली. नाटकातून समाजाला संदेश देण्याचा प्रयत्न केला. पौराणिक नाटकांपेक्षा स्वतंत्र सामाजिक नाटकांची, समस्याप्रधान नाटकांची त्यांनी निवड केली. स्त्री शिक्षणाचा संदेश देणारे 'दामिनी', शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेवर प्रकाश टाकणारे 'शहा शिवाजी', धर्म परिपरिवर्तनाच्या समस्येवर आधारित 'संन्यासाचा संसार', हुंडा समस्येवर 'हाच मुलाचा बाप', गांधीवादी विचारांचे आणि ग्राम स्वराज्यावर आधारित 'सत्तेचे गुलाम', स्वातंत्र्य संग्रामावर आधारीत 'तुरुंगाच्या दारात', स्वातंत्र्य, न्याय, स्वाभिमानाचा संदेश देणारे 'राक्षसी महत्वाकांक्षा', ही स्वतंत्र नाटके त्यांनी ललितकलादर्श नाटक मंडळीकडून सादर केली. इतर नाटकातही सामाजिक संदेश असावा, असा आग्रह ते नाटक करतांना नाटककारांना करीत असे.

सामाजिक विषमता, जातीवाद, वर्णवादाचा त्रास खुद्द केशवरावांनाही त्यांच्या आयुष्यात सहन करावा लागला होता. बहुजन समाजातून ते आल्यामुळे आणि त्याकाळची परिस्थिती बघता त्यांना या अशा वृत्तीला सामोरे जावे लागले. परिणामी स्वतः नाटक मंडळी स्थापन केल्यावर अस्पृश्यता, जातिभेद, उच-नीच या भावनेला त्यांनी थारा दिला नाही. स्वतःचे नाट्य कर्तृत्व सिध्द केल्यावरही 'संयुक्त मानापमान' नाटकाच्या प्रयोगाचे ठरले, तेव्हा खुद्द बालगंधर्वांच्या गुरुवर्यांनी बालगंधर्वांवर राग काढला होता. आपली नापसंती व्यक्त केली होती. "त्या शुद्राचे जोडे उचलणार आहेस का तू?" असा प्रश्न त्यांनी बालगंधर्वांना केला होता. पण बालगंधर्व मोठ्या मनाचे होते. गुरुवर्यांची आज्ञा त्यांनी शिरोधार्य मानली नाही. पण हे सुध्दा खरे होते की, ब्राम्हण नसलेला कुणीही नट यापूर्वी नायक म्हणून त्यांच्या पुढे उभा राहिलेला नव्हता. बाटग्याच्या म्हणजे धर्म परिवर्तन केलेल्या माणसावर 'संन्याशाचा संसार' नाटक केले म्हणून अनेकांची नाराजीही त्यांनी ओढवून घेतली होती. शिक्षण नाही, इंग्रजी येत नाही म्हणूनही त्यांना हिनवले जात असे. खाडिलकर,

कोल्हटकर, गडकरी यांनी त्यांचेसाठी कधीही नाटक लिहून दिले नाही, याचीही त्यांच्या मनात खंत होती. पण या सर्व अनुभवांमुळे ते अधिक जिद्दी बनले होते. पण ही जिद्द सकारात्मक होती, नवनिर्मितीला पोषक अशीच होती.

अकुलीनतेच्या नावावर हिराबाई पेडणेकर यांचीही उपेक्षा करण्यात आली होती. हिराबाई या कलावंतीन समाजातील होत्या. त्यांचा वर्ण, जात लक्षात घेऊन कुणीही त्यांचे नाटक घेतले नाही. हे कळल्यावर स्वतः केशवराव त्यांच्याकडे गेले आणि ललितकलादर्शसाठी या नाटकाची मागणी केली. ते नाटक सादर केले आणि लोकप्रिय करूनही दाखविले. त्याकाळी एक उपेक्षित वर्गातील स्त्री जिद्दीने स्वावलंबनाचा, स्त्री शिक्षणाचा विचार मांडते, याचा केशवरावांना अभिमान होता. हिराबाईंबद्दल बाबुराव देशपांडे लिहितात, "आपले नाटक किर्लोस्कर कंपनीने रंगभूमीवर आणावे, अशी त्यांची इच्छा होती. परंतु एका कलावंतीनीचे नाटक घेणे हे किर्लोस्कर कंपनीला कमीपणाची गोष्ट वाटली म्हणून त्यांनी ते नाटक नाकारले. पुढे तेच नाटक केशवरावांनी जिद्दीने केले. गुण हा जातीवर नसतो याचे पहिले बिजारोपण करण्याची प्रथा प्रथम केशवरावांनी रंगभूमीवर सुरू केली." या संदर्भात हिराबाईंनी सुध्दा 'दामिनी' नाटकाच्या प्रस्तावनेत आपली कैफियत मांडली आहे. हिराबाई म्हणतात, "माझ्या सारख्या अशिक्षित स्त्रीची सामान्य कृती रंगभूमीवर कशी येते, याबद्दल मला काळजी वाटत होती. परंतु ललितकलादर्श संगीत नाटक मंडळीचे मालक रा.रा. केशवराव भोसले यांनी हे नाटक रंगभूमीवर आणून ठिकठिकाणी त्याचे प्रयोग केले. या त्यांच्या धैर्याबद्दल व स्त्री शिक्षणाच्या आस्थेबद्दल त्यांचे मी कितीही आभार मानले तरी थोडेचे आहे." मराठी रंगभूमीवरील या अश्लाघ्य अशा घटनेसंबंधी ख्यातनाम लेखक, नाटककार पु.ल. देशपांडे म्हणतात, "कुलीन नाही म्हणून जिचं नाटक किर्लोस्कर कंपनीने नाकारले, त्याच हिराबाई पेडणेकर या कलावंतीन, गायिकेचं 'दामिनी' हे नाटक केशवरावांनी रंगभूमीवर आणलं. या नाटकामुळे साहित्य क्षेत्रातल्या दांभिकांच्या डोक्यावर लुगड प्रहार करण्याचं श्रेय ललितकलेनं मिळवलं, ते मला फार महत्वाचं वाटतं. कुलीन-अकुलीन हे माणसुकीला सोडून असलेले विचार मोठ-मोठ्या विद्वानांना फेकून देण्याचं धैर्य नव्हतं, ते धैर्य केशवरावांनी दाखवलं. कंपनीला केवळ पैसा नाही तर सामाजिक प्रतिष्ठाही मिळाली पाहिजे, अशी त्यांची जिद्द होती." आणि म्हणूनच ललितकलादर्शने व्यवसाय तर केलाच पण सामाजिक प्रतिष्ठाही मिळवली. म्हणूनच टिळक - गांधी स्वराज्य फंडासाठी इतक्या नाटक मंडळ्या

असताना गंधर्व नाटक मंडळीसोबत 'संयुक्त मानापमान' करण्यासाठी ललितकलादर्श नाटक मंडळीची निवड करण्यात आली होती.

सामाजिक बांधिलकी म्हणूनच ललितकलादर्शची लोकप्रिय प्रतिमा त्यांनी निर्माण केली. राजाश्रय नाकारून खास 'लोकाश्रयाखालील नाटक मंडळी' अशी बिरुदावली त्यांनी आपल्या नाटक मंडळीच्या नावापुढे लावली. आणि या नाटक मंडळीला केवळ मंडळी म्हणून नाही तर एक प्रशिक्षण केंद्र, सांस्कृतिक केंद्र अशी ओळख मिळवून दिली. मुलांच्या मनोरंजनासाठी बालनाट्ये सादर केलीत. कंपनीसाठी घेतलेल्या कर्जाचा बोझा कधीही मंडळीतील सहकाऱ्यांवर, कलावंतांवर पडू दिला नाही. ठराविक तारखेला न चुकता ते पगार वाटत. अधिक उत्पन्न झाले तर सर्वांना बक्षिसी देत. कलावंत सहकाऱ्यांची ते काळजी घेत. एवढेच नाही तर स्वखर्चाने मराठी नाट्य संमेलनाचेही आयोजन त्यांनी केले. सत्कारात मिळालेली मोठ्या रकमेची थैली त्याक्षणीच आपले गुरु जांभेकर बुवांना अर्पण केली. राजर्षि शाहू महाराजांचा 'शंकराचार्य लोकनियुक्त असावा' हा विचार त्यांनी आपल्या 'संन्यासाचा संसार' या नाटकात मांडून शाहू महाराजांच्या सामाजिक आणि वैचारिक कार्याचा पुरस्कारही केला. फुले-शाहू महाराजांच्या वैचारिक-सामाजिक कार्याचा त्यांनी अशा प्रकारे जणू अंगीकारच केला होता, असे म्हणता येऊ शकेल. स्वतंत्रता सेनानी आणि नाटककार वीर वामनराव जोशी यांची त्यांनी नेहमीच पाठराखण केली.

सामाजिक भेदाभेदाशी सामना लहानपणापासूनच केशवरावांना करावा लागला, पण त्यांनी त्यांची कधी तमा बाळगली नाही. त्यावर मात करीत त्यांनी आपली रंगभूमीवरील कारकीर्द सलामत ठेवली. या भेदाभेदाची एक घटना डॉ. रुस्तम अचलखांब यांनी पुढील  शब्दात मांडली आहे. ते म्हणतात, "त्याकाळी नाटक मंडळ्या बिऱ्हाडातून जातपात पाळत असत. केशवराव ब्राम्हणेत्तर नट होते. त्यांच्या बाबतीत घडलेला एक प्रसंग मामा वरेरकर सांगतात, 'त्याकाळी जातीचा प्रपंच होता. ब्राम्हणांची पंगत निराळी आणि ब्राम्हणेत्तरांची पंगत निराळी बसे. ब्राम्हणांची उष्टी कंपनीतला गडी काढत असे. ब्राम्हणेतर आपली उष्टी स्वतःच काढीत. मात्र मुख्य भूमिका करणाऱ्या ब्राम्हण नटाची उष्टी दुसऱ्या कुण्यातरी मुलाला काढावी लागत. शारदेची भूमिका करणाऱ्या कृष्णा देवळीचं उष्ट केशवरावांना काढावे लागे. हे त्यांना डाचत असे. एकदा कृष्णा आजारी पडल्यामुळे त्याची शारदेची भूमिका केशवरावांनी केली. ती अप्रतिम झाली आणि पुढे त्यांच्या वाट्याला हीच

भूमिका आली होती.'' या नंतरचा शारदा आणि केशवराव भोसले यांच्या यशाचा इतिहास सर्वांना माहित आहे. पुढे आपली स्वतःची नाटक मंडळी 'ललितकलादर्श'ची स्थापना केली. या कंपनीत मात्र हा भेदाभेद, अस्पृश्यता केशवरावांनी मोडीत काढली आणि सहभोजनाची प्रथा सुरू केली. जो त्रास त्यांना झाला तो आपल्या मंडळीत कुणालाही होऊ नये, याची स्वतः जातीने केशवराव काळजी घेत असे. हिराबाई पेडणेकर या विदुषी, पहिल्या स्त्री नाटककार पण अकुलीन/वारांगणा/नायकीन या वर्गातल्या असलेल्या गायक कवयित्री आणि नाटककार असलेल्या कर्तबगार स्त्रीला केशवरावांनी संधी दिली. हा इतिहासही आता लपून राहिलेला नाही. केशवरावांची सामाजिक बांधिलकी सर्वश्रुत होती. या बांधिलकीतून उपेक्षितांना नेहमीच त्यांनी मदतीचा हात दिला.

●●●



**पत्नी सावित्रीबाई सोबत केशवराव**



**मराठी रंगभूमीवरील पहिली महिला नाटककार म्हणून कलावंतीन समाजातील हिराबाई पेडणेकर सन्मान मिळवून दिला.**

# जाती पेक्षा गुणवत्ता श्रेष्ठ

**सं**गीतसूर्य केशवराव भोसले हे आधुनिक मराठी रंगभूमीचे शिल्पकार व हिराबाई पेडणेकर या पहिल्या मराठी स्त्री नाटककार दोघांचेही कर्तृत्व आकाशाला गवसणी घालणारे पण वर्ण, जातीची उतरंड असलेल्या समाज व्यवस्थेत त्यांची तशी उपेक्षाच झाली. केवळ ३१ वर्षांचे आयुष्य लाभलेल्या केशवरावांनी ३१ वर्षात ५२ भूमिका केल्या. रंगभूमीवर आश्चर्यजनक सुधारणा घडवून आणल्या. आधुनिक मराठी रंगभूमी घडवण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. वारांगणा समाजातील विद्वान नाटककार हिराबाई पेडणेकर यांना सर्व नाटककारांनी, नाट्य संस्थांनी नाकारल्याचे कळताच केशवरावांनी हिराबाईंचे 'दामिनी' हे नाटक घेतले. त्याचे यशस्वी प्रयोग केले. आणि त्यांना पहिल्या मराठी स्त्री नाटककाराचा सन्मान मिळवून दिला.

हिराबाई पेडणेकर यांचा जन्म सावंतवाडी येथे २३ नोव्हेंबर १८८५ रोजी झाला. आईचे बालपणीच निधन झाल्याने कलावंतीनीचा व्यवसाय करणाऱ्या मावशीने म्हणजे भीमाबाईने त्यांचे संगोपन केले. याच व्यवसायात रहावे, असा प्रयत्न त्यांच्या मावशीने केला, परंतु तिच्या विरुध्द बंड करून हिराबाईने शिक्षण घेतले. मराठी, इंग्रजी आणि संस्कृत अशा तीनही भाषा अवगत केल्या. संगीतकलेचे शिक्षण घेतले. गायन आणि लेखन या कलेत त्यांनी प्राविण्य मिळविले. नायकिनीचा वेश्या व्यवसाय करावा लागू नये म्हणून १९०१ पासून त्या किर्लोस्कर कंपनीचे मालक आणि प्रसिध्द नट नानासाहेब जोगळेकर यांच्या आश्रयाला पत्नी म्हणून राहिल्या. वयाच्या १९ व्या वर्षी म्हणजे १९०४ मध्ये हिराबाईंनी आपले पहिले नाटक 'संगीत जयद्रथ विडंबन' लिहिले. १९१२ साली 'संगीत दामिनी' या नाटकाची त्यांनी रचना केली. प्रारंभीच्या काळात त्यांनी 'संगीत मिराबाई' हे नाटकही लिहिले होते. 'दामिनी' हे नाटक स्त्री स्वावलंबन, सुधारणावादी आणि स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करणारे सामाजिक नाटक होते. आपले हे नाटक किर्लोस्कर कंपनीने करावे अशी त्यांची इच्छा होती. पण 'अकुलिनता' आणि अभिजन अभिरुचीच्या नावावर त्यांना नकारच मिळाला.

परशुरामपंत बर्वे, शंकरराव धुळेकर, भाष्करबुवा बखले या बड्या संगीत शिक्षकांकडून त्यांनी संगीताचे शिक्षण घेतले. गो.ब. देवल, राम गणेश गडकरी, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि नानासाहेब जोगळेकर यांचेशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. पण हा जिव्हाळा त्यांना नाटककार म्हणून मान्यता देण्यास कामी आला नाही. यापैकी कुणीही त्यांचे नाटक रंगभूमीवर आणण्यास मदत केली नाही. केशवराव भोसले यांना ही माहिती कळताच ते स्वतः जाऊन हिराबाईंना भेटले. सन्मानाने नाटकाची मागणीही केली. अशा प्रकारे 'संगीत दामिनी' हे नाटक ललितकलादर्शने रंगभूमीवर आणले आणि गाजवले सुध्दा. केशवरावांनी त्यात स्वतः 'दामिनी'ची भूमिका केली. केशवरावांनी हे नाटक रंगभूमीवर आणले नसते तर एका प्रतिभासंपन्न स्त्री नाटककाराला कधीही प्रकाशात येता आले नसते.

या नाटकाची, हिराबाईंची आणि संगीतसूर्य केशवराव भोसले यांची दखल त्याकाळी प्रसिध्द असलेल्या मनोरंजन मासिकानेही घेतली होती. जानेवारी १९१३ च्या अंकात, "हे नाटक एका, विद्येत मागासलेल्या जातीतील एका विदुषी स्त्रीने लिहिले असून महाराष्ट्र रंगभूमीवर येण्याचा हा पहिलाच प्रसंग

आहे. याबद्दल हिराबाईंचे आणि केशवराव भोसले यांचे अभिनंदन करतो, दामिनी हे नाटक उच्च दर्जाचे असून नीतिदृष्ट्या अतिशय श्लाध्य व शुध्द आहे. संविधानक, पात्रे, प्रसंगी, सुबोध पद्ये, काव्यप्रतिमा दर्शक आणि कर्ण मनोहर चालीवर रचलेली आहे.'' पण केवळ ही गुणवत्ताही कामी आली नाही तर त्यांची जात आणि वर्ण त्यांच्या योग्यतेच्या आड आला. पु.ल. देशपांडे म्हणतात, ''केशवरावांनी रंगभूमीत आणलेल्या या नाटकामुळे साहित्य क्षेत्रातल्या दांभिकांच्या डोक्यावर लुगड प्रहार करण्याचे श्रेय ललितकलेने मिळवले. माणुसकीला सोडून असलेले विचार मोठ-मोठ्या विद्वानांना फेकून देण्याचे धैर्य नव्हते ते धैर्य केशवरावांनी दाखविले.'' केशवरावांनी केवळ हे धैर्यच दाखविले नाही तर हिराबाईच्या संगीत कलेची, नव्या चालींची मदतही घेतली. जाती, वर्णापेक्षा गुणवत्ता महत्वाची असते, हे त्यांनी सिध्द करून दाखविले.

संगीतसूर्य केशवराव भोसले यांनाही त्याकाळच्या बड्या नाटककारांची उपेक्षाच सहन करावी लागली. बालगंधर्वांच्या चाहत्या प्रेक्षकांकडून नकार आणि निंदानालस्तीचा अनुभव घ्यावा लागला, त्यामुळे उपेक्षेचे दुःख त्यांना कळत होते. म्हणूनच त्यांनी उपेक्षित हिराबाई पेडणेकरांना मदतीचा हात दिला. त्यांचेसाठी त्यांनी नाटक निर्मितीचा धोकाही पत्करला. पण जिद्दीने त्यांनी या धोक्यावर मातही केली. प्रथम मराठी स्त्री नाटककार म्हणून केशवरावांनी हिराबाईंना सन्मान प्राप्त करून दिला.

●●●



**ललितकलादर्शचे आधारस्तंभ केशवराव भोसले, व्यवस्थापक केशव शितुत, तमाण्णा, तवनापा चिवटे**

# ललितकलादर्शचे लोकशाहीकरण

एक कलावंत म्हणून संगीतसूर्य केशवराव भोसले यांचा पुनर्जन्म स्वदेश हितचिंतक नाटक मंडळीतच झाला, हे अगदी खरे आहे. 'संगीत शारदा' या नाटकातील शारदेच्या भूमिकेने नट म्हणून आणि या नाटकातील गाजलेल्या नाट्यगितांनी विशेषतः 'मूर्तिमंत' भिती उभी' या पदाने त्यांना गायक म्हणून ख्याती मिळवून दिली. जवळ-जवळ १४ वर्षे ते या नाटक मंडळीत होते. या मंडळीचे ते 'हुकूमी एक्का' किंवा 'चलनी नाणे' होते. 'वेतनवाढी'वरून त्यांनी व त्यांचे बंधू दत्तोबा यांनी काही कलावंतांसह स्वदेशी हितचिंतक नाटक मंडळी सोडली, असाच संदर्भ सर्वत्र मिळतो. पण 'माझा नाटकी संसार' या आत्मचरित्रातून या संदर्भात वेगळीच माहिती समोर येते.

मामा वरेरकर आणि केशवरावांचा स्नेहसंबंध या मंडळीत असताना पासूनच होता. वरेरकर तेव्हा नवोदित नाटककार होते. स्वदेश हिंतचिंतक मंडळीने त्यांचे 'कुंजबिहारी' नाटक करावे, म्हणून ते नेहमीच कंपनीत खेटे घालीत. याच काळात या दोघांची ओळख झाली. भार्गवराम विठ्ठल वरेरकर हे त्यांच खरे नाव पण केशवराव त्यांना 'मामा' याच नावाने संबोधतात. 'मामा' हे नाव त्यांनीच दिलेले आहे. पुढे याच नावाने वरेरकर प्रसिध्द पावले. मामांनी

या चरित्रातून अनेक नवी माहिती उजेडात आणली आहे. कंपनी केशवरावांच्या भरवशावर चालू लागली होती. त्यामुळे ते मालक जनुभाऊ निमकरांच्या गळ्यातील ताईत बनले होते. एवढेच नव्हे तर वयाच्या १७ व्या वर्षी म्हणजे १९०७ मध्ये केशवरावांना मालकही केले होते. तरी अर्थातच वेतनावरून वाद होता, हे जरी असले तरी तेच एकमेव कंपनी सोडण्याचे कारण नव्हते.

केशवराव जनुभाऊंच्या हुकूमशाहीला, एकाधिकारशाहीला कंटाळले होते. कंपनी चालवतांना 'तोडा-फोडा आणि राज्य करा' या न्यायाने कलावंत, सहकाऱ्यांना ते वागवत. परस्परांची भांडणे लावणे, चुगलखोरी करणे वगैरे कामे ते करीत. विरोधक सभासदांची हेरगिरी करण्यास ते केशवरावांनाही बाध्य करीत. शिव्या, रागावणे, धमक्यांचाही या छळात समावेश होता. पण हे काम जनुभाऊ प्रेमाने, कपटाने करीत. जरी जनुभाऊंचे केशवरावांवर पोटच्या पूत्रवत प्रेम होते तरी केशवरावांना त्यांची ही पध्दत आवडत नसे. म्हणून स्वदेश हितचिंतक नाटक मंडळी सोडण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता. मंडळीतील विरोधी पक्षात केशवराव सामिल असल्याचे, कंपनी फोडत नवी कंपनी स्थापन केली जाणार असल्याची कुणकुण जनुभाऊंना लागली होती. केशवराव विरोधी सभासदांच्या हाती लागू नये म्हणून केशवला त्यांनी अज्ञातवासात (अलिबाग येथे) नेऊन नजरकैदेत ठेवले होते. पण केशवराव शिताफिने तेथून फरार झाले. परत आपल्या साथीदारांना जमवून ललितकलादर्शची हुबळीला जाऊन १ जानेवारी १९०८ रोजी स्थापना केली. स्वदेशी हितचिंतक नाटक मंडळीचा हुकूमशाही कारभार, कर्दनकाळ ठरलेला मालक आणि त्याची एकाधिकारशाही बघून केशवरावांनी प्रारंभापासून ललितकलादर्श लोकशाही पध्दतीने चालविण्याचा प्रयत्न केला. स्थापन समयी या नाटक मंडळीचे २१ मालक होते. जनुभाऊ जे स्वदेशी हितचिंतक नाटक मंडळीत करीत ते केशवरावांनी कधीही ललितकलादर्शमध्ये केले नाही.

मतभेद झाले तरी सोबत बसवून त्याचे निराकरण करणे, सामूहिक निर्णय घेणे, निर्णयासाठी बैठकी घेणे, मिळकतीच्या हिशेबात पारदर्शकता ठेवणे, कुणाला मालकी अथवा नाटक मंडळी सोडायची असल्यास शत्रुत्व भाव न ठेवता त्याचा हिशेब व्यवस्थितपणे चुकता करणे, सृजन आणि निर्मितीचे स्वातंत्र्य कलावंतांना आणि सहकाऱ्यांना देणे, त्यांच्या सूचनांचे पालन करणे, सर्वांना भेदभाव न करता एकाच पंगतीत बसवून जेवणे, निर्णय स्वातंत्र्यात सर्वांचा सल्ला घेणे, हे काम ते व्यवस्थितपणे करीत. स्वदेश हितचिंतक मंडळीत

ज्या कारणांसाठी केशवरावांना बंड करावे लागले, ती कारणे त्यांनी 'ललितकलादर्श' मध्ये निर्माण होऊ दिली नाही. 'ललितकलादर्श'चे लोकशाहीकरण करून मराठी रंगभूमीवर नवा पायंडा पाडला. इतकेच नव्हे तर मृत्यूपत्र करतांना आपले बंधू, पुतणे, भाचे, नातेवाईक यांना वारसदारी न देता निष्ठावान, अभिजात कलावंत, नेतृत्वगुण असलेल्या बापुसाहेब पेंढारकरांना आपले वारसदार नेमले. यातच केशवरावांचे मोठेपण निर्विवादपणे सिध्द होते.

●●●



**सहकारी नानासाहेब चाफेकर स्त्री भूमिकेत**



**वीर वामनराव जोशी यांच्या 'राक्षसी महत्वाकांक्षा' या नाटकातील सर्वाधिक लोकप्रिय भूमिकेत केशवराव भोसले**

# साभिनय गायनाचा आदर्श

केशवरावांच्या संगीत विषयक साभिनय गायकीमुळे, संगीतातील नवे प्रयोग आणि आगळ्यावेगळ्या सादरीकरणामुळे प्रेक्षकांनी उत्स्फूर्तपणे त्यांना 'संगीतसूर्य' ही पदवी बहाल केली. संगीतासंबंधी त्यांनी केलेले प्रयोग थक्क करून सोडणारे आहे. परंपरेची वाट न चोखाळता स्वतःचीच अशी स्वतंत्र 'भोसले गायन शैली' निर्माण केली. गाण्यातील वैविध्यता हा त्यांच्या गायकीचा विशेष होता. सुमारे २७ वर्षे ते रंगमंचावर आणि मैफलीतही गात होते. त्या सोबत गाण्याची अथक साधना आणि तपश्चर्याही करीत होते. आवाजाची दैवी देणगी बालगंधर्वांप्रमाणे त्यांना मिळाली नव्हती. जी गायकी त्यांनी कमविली ती जिद्दीने, अथक प्रयासाने आणि अमर्यादित नाट्यनिष्ठेने. आत्मपरीक्षण, आत्मचिंतन, नवनवीन प्रयोग यातून त्यांनी ही गायकी जन्माला घातली होती. आवाजाची पट्टी आणि पल्ला वाढविण्याचा प्रयत्न ते सतत करीत होते. गायकीत नेत्रदिपक असे यश मिळविल्यावरही ते देवाला फक्त आणखी एक पट्टीचा, चढ्या पट्टीचा, पल्याच्या आवाजाची मागणी करीत, यातून त्यांच्या कलासक्त

आणि कलानिष्ठ जीवनाची ओळख होते.

मूळ चालीतल्या रागाला शोभेल असा मिश्र राग ते शोधत असत. त्याचा उपयोग ते आपल्या गायकीत करीत. त्यांनी स्वतःचे असे एक वेगळेच स्वरशिल्प निर्माण केले होते. नाटकाची किंवा गाण्याची मैफल कितीही वाजता संपू दे, ते त्यानंतर नाटकाच्या दृश्यांची, आपल्या पदांची किंवा एखाद्या बंदिशीची तालीम करीत. जोपर्यंत आपल्या गाण्याला, अभिनयाला झळाळी प्राप्त होत नाही तोपर्यंत ते त्याचा पिच्छा पुरवत. अशा प्रयत्नवादाचे ते मूर्तिमंत प्रतिक होते. बालपण संपल्यावर जेव्हा त्यांचा कोमल आवाज फाटला, तेव्हा त्यांनी कठोर रियाज करून आपला गेलेला आवाज परत मिळविला. तानेची अथकपणे आळवणी केली. पल्ला वाढविला. आवाजही खणखणीत केला. लवचिकता वाढविली. स्वरयंत्रावर आपली हुकूमत प्रस्थापित केली. पुढे प्रयोग म्हणून कर्नाटकी गायन शैलीवर प्रभुत्व मिळविले, त्यातही परिष्करण करून, लोकाभिमुख सुधारणा करून ती मिश्र गायकी रसिकाभिमूख केली. नाद आणि लय यावर त्यांची विलक्षण पकड होती. त्यांची श्रवण भक्ती आणि श्रवण शक्तीही उल्लेखनीय होती. अर्थात लहानपणापासून त्यांना गायनातील शक्तीस्थळे कळत होती. शारदेमध्ये 'मूर्तिमंत भिती उभी' तर सोडाच पण इतर पदेही ते ताकदीने, आकर्षक पध्दतीने गात. त्यांची पदे इतकी लोकप्रिय झाली होती की नाटकाचे तिकीट संपल्यावरही प्रेक्षक त्यांची गाणी ऐकायला वेगळे दोन रुपयांचे तिकीट घेऊन नाट्यगृहाच्या दरवाज्यासमोर उभे राहून त्यांची गाणी ऐकत. त्यापूर्वी शारदा नाटकातच ते वल्लरीची दुय्यम भूमिका करीत त्याही वेळी त्यांची गाणी प्रेक्षकांना अतिशय आवडत असे.

केशवरावांनी आपल्या ३१ वर्षांच्या काळात अनेक नवे प्रयोग आणि परंपरांचे जनकत्व मिळवले होते. अनेक विक्रम त्यांच्या नावावर केले. त्याचप्रमाणे अगदी लहान वयात फोनोग्राम (रेकॉर्डिंग तबकडी) वर आपले गाणे रेकॉर्ड करण्याची संधी त्यांना मिळाली होती. रत्नागिरीला एकदा 'शारदा' नाटकाचा प्रयोग होता. या नाटकात केशवराव वल्लरीची भूमिका करीत असे. रत्नागिरीला प्रा. पाठारे नावाचे गृहस्थ नव्याने आलेल्या 'बायोस्कोप'वर चित्र दाखविण्याचा व्यवसाय करीत. त्यांनीही केशवरावांनी गायलेली वल्लरीची पदे आवडली होती. तेव्हा आपल्या 'बायोस्कोप' शो चा प्रचार करण्यासाठी त्यांनी वल्लरीची पदे फोनोग्रामवर रेकॉर्ड करून घेतली होती. त्यांचे "म्हातारा न इतुका वय अवघे पाऊनशे" हे पद तर त्याकाळी खूपच लोकप्रिय झाले होते. त्याचाच जाहिरात म्हणून प्रा. पाठारेंनी उपयोग केला. अशी माहिती मामा वरेरकर यांनी आपल्या

'माझा नाटकी संसार' या आत्मचरित्रात दिली आहे. अशा प्रकारे इतक्या लहान वयात फोनोग्रामवर गाणे रेकॉर्ड झाल्याचा विक्रमही केशवरावांच्या नावावर आहे.

नाट्य संगीताचा उपयोग त्यांनी केलाच पण त्याचा अतिरेक होऊ दिला नाही. नाट्य संकेताला अनुसरून पदांची कल्पक योजना केली. संगीतात केंद्रस्थानी असतात ते स्वर आणि स्वरांचे यश अवलंबून असते त्याच्या रचनेवर, याची केशवरावांना चांगलीच जाण होती. म्हणून संगीताच्या नाद आणि लयीचा सम्यक वापर करून ते नाट्यपदांची आकर्षक रचना करीत असे. नाट्यपदाचा सांगितिक उपयोग, त्यामागील त्याची दृष्टी अगदीच स्पष्ट होती. दृश्य आणि त्याच्या श्राव्यात्मकतेवर त्यांची पकड होती. नाट्यपदे नाट्याभिव्यक्तीचा संकेत असतात, त्याचे नेहमीच त्यांनी पालन केले. नाट्यार्थ, वाचिकता आणि नाट्य संगीत याचा सम्यक समन्वय साधन्यावर त्यांचा भर असे. आचार्य अ.द. वेलवणकर म्हणतात, त्या प्रमाणे, "संगीत नाटकातील पदे जेव्हा गद्य संवादाचेच नाटकात स्वतःच्या प्रकृतीनुसार रूप धारण करतात, तेव्हा त्याची रचना अभिनय गर्भ असावी, पात्रानुकूल असावी आणि या पदांचा आविष्कार साभिनय गायनाचा असावा" ही अशा प्रकारची समज केशवराव यांचेकडे होती. त्या काळात अन्य नाटक मंडळात नाट्य गायनाचा अतिरेक होता. साभिनय गायनापेक्षा मैफिली गाण्यांसारखी नाट्यपदे गायली जात. अभिनयाला कमी महत्व दिले जाई. पण केशवरावांनी गायन आणि अभिनय यांचा सुंदर समन्वय साधला होता. साभिनय अर्थगर्भ गायनाचा एक नवा आदर्श त्यांनी निर्माण केला होता.

●●●



संयुक्त मानापमानातील ही गाजलेली संगीतसूर्य केशवराव भोसले यांची वेशभूषा

# स्वाभिमानी मर्द मराठा

केशवरावांनी स्वदेश हितचिंतक नाटक मंडळीत असतांना आपल्या अभिनय, गायकीने प्रेक्षकांना आकर्षून घेतले होते. त्यांच्यामुळे या नाटक मंडळीची आर्थिक भरभराट तर झालीच पण प्रचंड लोकप्रियताही मिळाली. ते या मंडळीचे हुकमी एक्के बनले होते. त्यांचा त्यावेळच्या सर्वच नाटक मंडळीने धसका घेतला होता. परिणामी केशवरावांना स्वदेशी हितचिंतक नाटक मंडळीतून फोडण्याचे प्रयत्न बरेच प्रयत्न झाले. किर्लोस्कर नाटक मंडळीनेही त्यांना

विविध आमिषे दिली होती. त्यामुळे मंडळीचे मालक जनुभाऊ निमकरही चिंतीत झाले होते. नागपूर दौऱ्यात ती मंडळी असतांना किर्लोस्कर कंपनीचे शंकरराव मुजूमदार तेथे पोचले. जनुभाऊंना ही वार्ता कळताच नागपूरी नाटकांचा दौराच त्यांनी रद्द करून टाकला. ते केशवरावांना घेऊन तात्काळ कोल्हापूरला परत आले. इतर कोणत्याही नाटक मंडळीच्या माणसाला ते केशवरावांना भेटू देत नसत. इतर कोणत्याही नाटक मंडळीच्या संपर्कात ते येऊ नये म्हणून जनुभाऊंनी त्यांना बंदोबस्तात ठेवले होते. पण एके दिवशी या गुलामगिरी विरुध्द, एकाधिकारशाही विरुध्द, हुकूमशाही विरुध्द यांनी विद्रोह केला आणि त्यांनी स्वतःच्या ललितकलादर्श मंडळीची हुबळी येथे जाऊन स्थापना केली. केशवराव यांच्या अभावी स्वदेशी हितचिंतक मंडळीचे शारदा नाटक चालले नाही. विष्णुपंत पागनीस यांनी शारदेची भूमिका करण्याचा प्रयत्न केला पण तो प्रेक्षकांनी स्विकारला नाही. जनुभाऊंनी केशवरावांना क्षमा मागीतली, मंडळीत परत येण्याची विनंती केली पण स्वतंत्र बाण्याच्या या मर्द मराठ्याने या समेटास विनम्रपणे नकार दिला. मामा वरेरकरांनी हा सर्व इतिहास सविस्तरपणे मांडला आहे. गायन, अभिनयाची ताकद, गुलामगिरीची, हुकूमशाहीची चीड आणि नवे काही करून दाखविण्याची केशवरावांची जिद्द हा त्यांच्यातला वेगळेपणा लक्षात घेण्यासारखा आहे.

त्यांच्या स्वाभिमानी वृत्तीचे सुध्दा अनेक किस्से आहेत. त्यांच्या देशसेवेचे, मैत्री भावाचे किस्सेही कमी नाहीत. असाच एक किस्सा आहे, नाटककार आणि स्वातंत्र्य योध्दे वीर वामनराव जोशी यांचा. नागपुरात ललितकलादर्श नाटकासाठी मुक्कामी असताना ब्रिटीश पोलीस, वीर वामनराव जोशी यांना अटक करण्यासाठी शोधत होते. पोलीस कधीही मंडळीवर धाड टाकू शकत होते. बिऱ्हाडातील सहकारी घाबरले. नाटक मंडळीचे नुकसान होईल, या भितीने त्यांच्या सहकाऱ्यांनी बिऱ्हाडी मुक्कामास असलेले वीर वामनराव जोशी यांना दुसरीकडे जाण्यास सांगावे असे सुचविले. पण मैत्रीपोटी आणि राष्ट्रसेवेच्या भावनेपोटी हा सल्ला केशवरावांनी धुडकावून लावला. ते आपल्या सहकार्यांना म्हणाले, "मी नाटकात वर्षानुवर्षे लुगडे घालून कामे केली म्हणून मी काही षंढ झालो नाही. वामनरावांची जबाबदारी ही माझी जबाबदारी आहे. मी त्यांना बिऱ्हाडातून दुसरीकडे पाठवणार नाही," असा मर्दानी बाणा आपल्या आवडत्या नाटककारासाठी त्यांनी घेतला होता. प्रसंगी कुठलाही धोका पत्करण्याचे धाडस त्यांचेकडे होते.

अमरावती येथे 'गोपीचंद नाटका'चा प्रयोग ठरला होता. ऐनवेळी २०-२५ कलावंत नाटक मंडळी सोडून निघून गेले. प्रयोग बंद पडेल, अशी स्थिती निर्माण झाली होती. तेव्हा उर्वरित सहकाऱ्यांची त्यांनी तात्काळ बैठक बोलाविली. वाढत्या पासून झाडझूड करणाऱ्यांना भूमिका वाटून दिल्या. त्यांची तालीम घेतली. स्वतःकडेही अनेक भूमिका ठेवल्या. त्या दिवशी नाट्यगृहाच्या झाडझुडीपासून खुर्च्या लावणे, सतरंज्या टाकणे, पडदा ओढणे, स्टेज लावणे, रंगभूषा करून देणे अशी सर्व कामे त्यांनी केली. आणि सर्वांगसुंदर असा प्रयोग त्या दिवशी सादर केला तसेच तो यशस्वी करून दाखविला. जेव्हा जेव्हा अशी वेळ मंडळीवर आली की ते त्यावर मात करून ते आपले लढवय्येपणा सिध्द करीत. मोठे कलावंत उपलब्ध नसले की ते बाल कलावंतांना घेऊन बाल नाटके तयार करीत. बाल कलावंतांना प्रशिक्षण देत. खरे तर ललितकलादर्श नाटक मंडळी नव्या कलावंतांसाठी एक प्रशिक्षण शाळाच होती. अशा प्रशिक्षित कलावंतांना आमिषे देऊन पळवून नेले जाई. त्यात अगदी गंधर्व नाटक मंडळीही अपवाद नव्हती. पण ते अशा नट मंडळीवर चिडत नसत, रागवत नसत. त्यांना म्हणत की 'जा महाराजा कुठेही जा पण ललितकलादर्शचा झेंडा उंच ठेवा. नाव कमवा, पैसा, प्रसिध्दी कमवा, किर्तिवंत व्हा, पण 'ललितकलादर्श'चे उपकार विसरू नका. मनाचा एवढा मोठेपणा, दिलदारपणा आणि परिपक्वता त्यांचेजवळ होती.

'संयुक्त मानापमान' आणि 'संयुक्त सौभद्र' या नाटकांचे अधिकाधिक प्रयोग व्हावे, मराठी रंगभूमीला चांगले दिवस यावे, अशी त्यांची इच्छा होती. पण केशवराव अभिनय आणि गायनात बालगंधर्वांना खाऊन टाकतात, म्हणून बालगंधर्वाचे गुरु, सहकारी यांनी त्यांना केशवरावांसोबत संयुक्त प्रयोग करण्यास मनाई केली होती. हे केशवरावांना कळताच त्यांनी बालगंधर्वांना निरोप धाडला की, 'असे आपणास, आपल्या मंडळीकरांना वाटत असेल तर मी धैर्यधराची भूमिका सोडून द्यायला तयार आहे. कुठलीही दुय्यम भूमिका करेन'. पण अखेर गंधर्व मंडळीने हा प्रस्तावही स्विकारला नाही. परिणामी 'संयुक्त प्रयोग' पुढे झाले नाही. केशवरावांचा हा मोठेपणा त्यांच्यातला समंजस्यपणा, उदारपणा, आणि त्यांची नाट्यनिष्ठा यांची ग्वाही देतो.

●●●




**हेच ते बालीवाला थिएटर जेथे संयुक्त मानापमान नाटकात प्रयोग सादर करण्यात आला होता**

# प्रयोगशिलता

**ना**विण्य आणि प्रयोगशिलता हा त्यांचा मूळ स्वभाव होता. म्हणून त्यांचा प्रत्येक प्रयोग हा नवतेचा मासलाच असे. पारंपरिक नेपथ्याच्या पुढे जाऊन 'वास्तववादी नेपथ्य' त्यांनी 'ललितकलादर्श'च्या माध्यमातून रूढ केले. बौध्दकालीन चित्रकला, शिल्पकलेच्या पध्दतीचा, तंत्राचा उपयोग त्यांनी करवून घेतला. 'शहा-शिवाजी' या नाटकातून आटोपशीर आणि सुसंगत असा बॉक्स सेट, फ्लॅट सीनचाही सर्वप्रथम उपयोग त्यांनी केला. मामा वरेरकरांवर इब्सेनी नाट्यतंत्राचा प्रभाव होता. त्याचा उपयोग करून ललितकलादर्शच्या नाटकात

त्यांनी इब्सेनी नाट्यतंत्राचा स्वीकार केला. त्यासाठी वरेरकरांची अनेक नाटके त्यांनी ललितकलादर्शच्यावतीने पुढे आणली. अशाप्रकारे आधुनिक मराठी रंगभूमी घडवण्यात त्यांनी महत्वाची भूमिका वठवली. केवळ मनोरंजनच नाही तर नाटकातून प्रबोधन झाले पाहिजे, ही आग्रही भूमिका ते आपल्या नाटककारांना पटवून देत. तशाप्रकारची नाटके लिहून घेत किंवा असा विचार असणारे नाटककार शोधत जाज्वल्य देशभक्तीची, वीर वामनराव जोशी यांची भाषणे एकूणच त्यांनी त्यांना तशाच आशयाचे नाटक लिहिण्याचा आग्रह केला. 'राक्षसी महत्वाकांक्षा' या जोशी यांच्या नाटकाने पुढे अनेक विक्रम रचले आणि देशप्रेमाची भावना जागृत केली. स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि राष्ट्रप्रेमाचे दर्शन या नाटकातून घडविले.

ललितकलादर्श स्थापन झाल्यावर 'शारदा' नाटकाच्या परवानगीवरून कोर्ट कचेरीच्या फेऱ्या माराव्या लागल्या. खुद्द प्रसिध्द नाटककार गोविंद बल्लाळ देवल यांनीच हा दावा ठोकला होता. त्यामुळे ते मेटाकुटीस आले होते. 'ललितकलादर्श'च्या मूळ उद्देशाला तडा जावू लागला. हे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी देवलांना क्षमा मागून हे प्रकरण कोर्टाबाहेर मिटविले. कारण त्यांना व्यवहारज्ञान होते. कचेरीच्या धबडग्यात अडकले तर इतर नाटके करता येणार नाही, याची त्यांना जाणिव झाली होती. मुळातच नाट्य व्यवहाराची सचोटी त्यांच्याकडे होती. नाट्य व्यवसाय कसा करावा, याची दृष्टी आणि अनुभव त्यांच्याकडे होते. आजच्या भाषेत आपण ज्याला 'मार्केटिंग', बिझनेस प्रमोशन, प्रॉडक्ट सेलेबल बनविणे, 'पॅकेजिंग', एडव्हर्टायजिंग वगैरे व्यवसायाच्या भाषेत म्हणतो, त्याचा अर्थ त्यांना अवगत होता. त्याचे महत्व त्यांना माहित होते. याच दृष्टीने त्यांनी आजच्या भाषेत ललितकलादर्श आणि केशवराव हे 'ब्रँडनेम' बनविले होते. त्यांना व्यवसायाची गणितं कळत होती. प्रेक्षकांची आवड-निवड, त्यांची मानसिकता याचाही त्यांचा चांगला अभ्यास होता. म्हणूनच ते कुशल संघटक, संयोजक, समन्वयक, व्यवस्थापक, मालक, भागीदार, कुशल प्रशासक म्हणून ते यशस्वी ठरले. रंगभूषेवर होणारा अधिकचा खर्च टाळण्यासाठी आणि दर्जेदार रंगभूषेचे साहित्य मिळविण्यासाठी मंडळींच्या बिऱ्हाडातच 'मेकअपचे सामान' तयार करण्याची व्यवस्था करून दिली. त्यासाठी रंगभूषणाकारांना प्रशिक्षण दिले. अशा प्रकारच्या खटपटी आणि 'जुगाड कार्यपध्दती' त्यांनी विकसित केली होती. एकूणच अशा प्रकारची आगळीवेगळी कामे इतर नाटक मंडळींच्या मालकाने, नटाने केल्याचे इतिहासात आढळत

नाही.

केशवराव अत्यंत कुटुंबवत्सल स्वभावाचे होते. भाऊ दत्तोबा आणि नारायणराव तसेच बहिण छायाक्का यांना त्यांनी शेवटपर्यंत अंतर दिले नाही. पण नात्यांपुढे जाऊन आपला व्यवहार आणि नैतिकताही जपली. 'ललितकलादर्श'चा वारसा बापुसाहेब पेंढारकरांना सोपवितांना आपल्या 'रक्तसंबंधा'पेक्षा नाट्यधर्माच्या संबंधांना अधिक महत्व दिले. एवढे बळ आणि नैतिकता, व्यवहारदक्षता आणि निर्लेपपणा त्यांच्याजवळ होता.

नाटककार, दिग्दर्शक, तालीम मास्तर म्हणूनही त्यांचे कार्य डोळ्याआड करता येणार नाही. आजच्या भाषेत आपण ज्याला 'स्टेज डिजायनर' म्हणतो, 'आर्ट डायरेक्टर' म्हणतो, 'स्टेज मॅनेजर' म्हणतो, तसेच 'कास्टींग डायरेक्टर' म्हणतो अशा सर्व भूमिका ते पार पाडत. नाटक संपादित करण्यामध्ये त्यांचा हातखंडा होता. एक छुपा नाटककार, नाट्य दिग्दर्शक त्यांच्यात दडला होता. ते नाटकांच्या तालमी घेत, नव्या कलावंतांना अभिनय कलेचे, गायनाचे धडे देत. ते एक अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे नाट्यकर्मी होते. नाटक कसे असावे, कसे बसवावे? ही कला त्यांना अनुभवाने अवगत झाली होती. नाटककाराला नाटक लिहितांना ते सूचनाही करीत, आवश्यक ते बदल करवून घेत. नाटकाचा आराखडा ते आधीच तयार करून ठेवत. या संदर्भात मामा वरेरकरांनीही लिहून ठेवले आहे. ते म्हणतात, "सकृतदर्शनी सार्वजनिक लोकप्रियतेची शंका उत्पन्न करणाऱ्या पतितपरावर्तन सारख्या विषयावरील नाटक हाती घेऊन अनुरूप साजसज्जा आणि वेशभूषणे यांची माझ्या इच्छेनुरूप जोड देण्याकरिता भरपूर व्याप करून, नाटक सुंदर स्वरुपात रंगभूमीवर आणून केशवरावांनी ते यशस्वी केले. स्वतः नाट्य प्रसंगाची निवड करून फोटो काढून दिले, त्याबद्दल ललितकलादर्श नाटक मंडळीचे मालक सुप्रसिध्द नट केशवराव भोसले यांचा मी फार आभारी आहे." मामा वरेरकरांच्या या वक्तव्यावरून त्यांचे नाट्यात्मक अष्टपैलूत्व स्पष्ट होते.

●●●



**स्त्री वेषभूषेत संगीतसूर्य केशवराव भोसले (वर्ष १९१३)**

# अंधश्रद्धेला विरोध

लेखक - निर्माता, लेखक - दिग्दर्शक यांचे एक चांगले 'सह-संबंध' (असोसिएशन) केशवकरांनी निर्माण केले होते. केशवरावांनी याच प्रकारे हिराबाई पेडणेकर, य.ना. टिपणीस यांचेशी चर्चा करून नाट्यलेखनात उपकारक बदल करून घेतले होते. डॉ. वि.भा. देशपांडे म्हणतात, "कोणत्याही नाटक मंडळीला चांगला नाटककार मिळावा लागतो तसा तो वरेरकरांच्या रूपाने 'ललितकलादर्श'ला मिळाला. तसेच नाटककारांनाही चांगली संस्था आवश्यक असते. प्रयोगशील वृत्तीचा-दृष्टीचा दिग्दर्शक आणि निर्माता मिळावा लागतो. उत्तम नेपथ्यकार, संगीतकार याही विभागातील महत्वाची दृष्टी माणसे लाभावी लागतात. असा समसमासंयोग झाला तर काय घडते तर त्याचे उदाहरण म्हणजे केशवराव भोसले आणि त्यांच्या 'ललितकलादर्श' नाटक मंडळीचे देता येईल." अशा प्रकारे केशवरावांच्या व्यक्तिमत्वाचे लक्षवेधक पैलू आपल्याला लक्षात येऊ शकते.

केशवराव सश्रध्द होते पण अंधश्रध्द अजिबात नव्हते. त्यांच्यावर किती तरी संकटे कोसळली पण अशुभ शकुनांची त्यांनी कधीच पर्वा केली नाही.

शांतीपाठ, होम हवन केले नाही की नवस बोलले नाहीत. त्यांच्या या अंधश्रध्दा विरोधी प्रकृती आणि प्रवृत्तीवर डॉ. राजीव चव्हाण यांनी विस्तृत प्रकाश आपल्या संगीतसूर्यावरील संपादित ग्रंथात टाकला आहे. ललितकलादर्श स्थापन झाल्यावर विविध ठिकाणी त्यांच्या नाटकांचे प्रयोग होऊ लागले. त्यावेळी लागोपाठ वेगवेगळे अपघात घडत गेले. हुबळीच्या पहिल्याच प्रयोगात दर्शनी विंगेने पेट घेतला होता. पण काही वेळातच सर्व कलावंतांनी मिळून आग विझवली आणि केशवरावांनी लागलीच प्रयोग सुरू केला. कोल्हापुरला दर्शनी पडदा सोडत असताना दोरी सुटली आणि तो पडदा रुळासकट स्टेजवर काम करणाऱ्या एका मदतनिसाच्या डोक्यावर पडला. त्यात तो जखमी झाला. हे प्रकरण व्यवस्थित आवरून त्यांनी लागलीच, पुन्हा प्रयोग सुरू केला. दुसऱ्या दिवशी पावसाने खोळंबा केला. मुसळधार पावसाने खेळच बंद पाडला. पण ते निराश झाले नाहीत.

कोल्हापुरच्याच एका प्रयोगात प्रेक्षकांच्या अतिगर्दीमुळे गॅलरी कोसळली. पण ते ही व्यवस्थित निस्तारून केशवरावांनी खेळ सुरू केला. सांगली येथे पहिल्याच खेळाला किशाबाबू पेटकर या कलावंतांच्या वेडसर मातोश्रीने नाट्यगृहाच्या शेजारच्या विहिरीत उडी घेतली. लोकांनी तिला जीवंत बाहेर काढले. परत थोड्या वेळाने नाटकाला सुरुवात झाली. निपाणी येथील प्रयोगात पिठाकडील ताटीला आग आगली. पण काही वेळातच आग विझवून त्यांनी 'शो मस्ट गो ऑन' केला. अमरावतीच्याही दोन घटना अशाच आहे. 'गोपीचंद' नाटकाचे वेळी २०-२५ कलावंत अचानक मंडळी सोडून निघून गेले पण त्यावरही आपल्या हिकमतीने मात करीत प्रयोग सादर केलाच. एकदा तर चक्क त्यांची पत्नी सावित्रीचे प्लेगने निधन झाले. 'संगीत सौभद्र' नाटकाचा प्रयोग घोषित झाला होता. प्रयोग रद्द करावा म्हणून सर्वांनी केशवरावांना विनंती केली, पण त्यांनी ती स्वीकारली नाही. अग्निसंस्कार करून लागलीच त्यांनी प्रयोगाची व्यवस्था केली आणि ठरल्या वेळेवर प्रयोग सुरू केला. या संदर्भात प्रबोधनकार ठाकरे आपल्या आठवणीत लिहितात, ''या सर्व अपघात अपशकुनांवर केशवराव खुलासा देत - ''अडीअडचणी यायच्याच, आल्याच पाहिजे, ती ही एक प्रकारची कसोटी आहे आणि त्या कसोटीला ललितकलादर्शने उतरलेच पहिजे.'' अशा घटना, असे अपघात झाल्यावरही कुठलेच धार्मिक विधी त्यांनी विशेषत्वाने केल्याचे आणि विघ्नहरणांसाठी कुठले जप-तप, पूजा-अर्चा केल्याचे उदाहरण सापडत नाही.

●●●



**'सन्याशाचा संसार' या नाटकात उजीवकडून शेवटचे केशवराव भोसले, सोबत बापूराव पेंढारकर, माधवराव वालावलकर**

# पाश्चात्य नवनाट्यतंत्राचा पुरस्कार

**सं**गीतसूर्य केशवराव भोसले म्हणजे खऱ्या अर्थाने आधुनिक मराठी रंगभूमीचे शिल्पकार, गायक, अभिनेता, निर्माता, दिग्दर्शक, प्रयोगधर्मी प्रयोक्ता, उद्यमी सूत्रधार, सर्वगुण संपन्न, हरहुन्नरी नाटकवाला अशा शब्दात त्यांचे वर्णन करता येईल. त्यांनी १९०८ साली स्थापन केलेली ललितकलादर्श संस्था आजही कार्यरत आहे. संगीतसूर्य ही पदवी सहजस्फूर्तणे लोकांनीच त्यांना बहाल केली. संगीत आणि अभिनय शिरोमणी बालगंधर्व यांच्या परमोत्कर्षाच्या काळातही एकलव्याप्रमाणे स्वतःचे अस्तित्व त्यांनी आपल्या व्यक्तित्वाने आणि कृतित्वाने सिध्द केले. त्यांच्या या दोन्ही विशेषांनाही अनेक पैलू आहेत. त्यापैकी पाश्चात्य नाट्यतंत्र आणि नाट्यतत्व यांचा स्वीकार करून रंगभूमीला नवी दिशा दिली, हा एक महत्वाचा विशेष आहे.

संगीतसूर्य केशवराव भोसले प्रत्यक्षात नाटककार नसले तरी प्रयोग संहिता (Production Script) बनवण्यात त्यांचा हातखंडा होता. एक नाट्य दिग्दर्शक म्हणून नाटकातील शक्तीस्थळे आणि त्याचा प्रयोग करण्यासाठी ते आपली स्वतःची प्रयोग संहिता बनवत. त्याचा नाट्य प्रयोगाच्या दृष्टिने उपयोग करीत. आत्मराम दोंदे ऋतूध्वज मदालसा, मामा वरेरकर (संन्यासाचा संसार),

हीराबाई पेडणेकर (दामिनी), वीर वामनराव जोशी (राक्षसी महत्वाकांक्षा), य.ना. टिपणीस (शहा-शिवाजी) यांनीही समय प्रसंगी त्याची कबुली दिलेली आहे. निर्माता-दिग्दर्शक आणि नाटककाराचा, एका चांगल्या सादरीकरणासाठी उत्कृष्ट आणि सर्जनशील असा सह-संबंध (Creative Association) केशवराव भोसले यांच्यापाशी होता, त्यामुळे नाटकात ते प्रभावी बदल सुचवित आणि तसे नाटकानुरूप परिवर्तन करून घेत असे. नाटककारही त्यांना व्यावसायिक अनुभव, अधिकार आणि कौशल्य लक्षात घेऊन तसे बदल आनंदाने करून देत असे. शिवाय नाटककाराच्या आवडी-निवडी, त्यांचा हातखंडा, विशेषता आणि त्यांची विचार पध्दती केशवराव यांना माहित असे. एकूणच या संबंधामध्ये सृजनशिलता हा महत्वाचा दुवा होता. नाटककारांची शक्तीस्थळे ते सकारात्मक पध्दतीने उपयोगात आणत असे. मामा वरेरकर हे ललितकलादर्शचे बिनीचे नाटककार होते. त्यांच्यावर इब्सेन या जगप्रसिध्द नाटककाराचा मोठा प्रभाव होता. नाट्यलेखनात इब्सेनी नाट्यतत्वाचा, नाट्यतंत्राचा वरेरकर नेहमी उपयोग करीत. या निमित्ताने केशवराव यांनाही इब्सेनचा परिचय झाला होता. त्यांनाही ते आवडल्याने केशवरावांनी नाटककाराच्या माध्यमातून इब्सेनचे नवे नाट्यतंत्र, नाट्यतत्व स्वीकारले होते.

वीर वामनराव जोशी हे समाजसुधारक आणि स्वातंत्र्यसैनिक होते. या जाज्वल्य देशभक्तीचा प्रभाव त्यांच्या नाट्यलेखनावर होता. शिवाय अंतोनीन आर्तो या लेखकाच्या 'थिएटर ऑफ द क्रुएल्टी' या नाट्यविचारानेही ते प्रभावित झाले होते. या विचारावर आधारित 'राक्षसी महत्वाकांक्षा' हे नाटक त्यांनी लिहिले होते. त्यात 'थिएटर ऑफ द क्रुएल्टी'च्या नाट्यतत्व आणि नाट्यतंत्रांचा उपयोग केला होता. वीर वामनराव जोशी यांची 'नाटके : समीक्षा व संहिता' या संशोधनपर ग्रंथात डॉ. मधुकर आष्टीकर म्हणतात, अंतोनीन आर्तोच्या या नाट्यशैलीची सुरूवात वीर वामनराव जोशी यांच्या 'राक्षसी महत्वाकांक्षा' या नाटकाने झाली. यादृष्टीने हे भारतातील क्रुएल्टी नाट्यतत्वाचे पहिले नाटक ठरावे आणि तो प्रयोग करणारी 'ललितकलादर्श' ही पहिली नाटक मंडळी. ललितकलादर्शचे हे पहिले यशस्वी नाटक. त्या काळात या नाटकाचे शंभरहून अधिक प्रयोग झाल्याची नोंद आहे. केशवरावांना हे नाटक इतके आवडले की त्यांनी उर्दू भाषेत त्याचे भाषांतर करवून घेतले आणि त्याचे प्रयोगही केले. या नाटकाचे खरे श्रेय वीर वामनरावांना जातेच पण केशवरावांसारख्या एका दृष्ट्या निर्मात्याला, दिग्र्शकालाही जाते. वामनरावांच्या

सानिध्यात केशवरावांचा परिचय 'थिएटर ऑफ द क्रुएल्टी'च्या नाट्यतत्वाशी झाला होता आणि त्याचा उपयोगही केशवरावांनी गंभीरपणे केला होता. नाटककार आणि निर्माता-दिग्दर्शक यांच्या 'सहसंबंधा'चे हे एक सृजनशील उदाहरण आहे. क्रुरतेच्या नाट्यात्मक परिसीमा केशवरावांनी आपल्या दिग्दर्शनातून आपल्या प्रतिरोधक पात्रांच्या अभिनयातून दाखविली. यात त्यांनी मृणालिनीची अविस्मरणीय भूमिका केली होती. सत्तापिपासू, राक्षसी महत्वाकांक्षा धारण केलेल्या मदालसेच्या क्रुरतेशी मृणालिनी संघर्ष करते. अशाप्रकारे प्रेक्षकांना नवनाट्य तंत्राचे दर्शन केशवरावांनी आपल्या नाट्यप्रयोगातून घडविले. केशवरावांच्या लढवय्या मृणालिनीच्या भूमिकेला त्याकाळी प्रचंड लोकप्रियता लाभली होती.

इब्सेनीयन (सामाजिक सुधारणावादी नाट्यतत्व) आणि क्रुएल्टी (जीवनातील क्रौर्य आणि हिंसेचे नाट्यात्मक दर्शन) थिएटरच्या नाट्यतंत्राचा प्रयोग त्यांनी केला. याच काळात मुंबई, पुण्यासह संपूर्ण भारतातही पारशी रंगभूमी लोकप्रियतेच्या शिखरावर होती. त्याचाही प्रभाव केशवरावांवर पडला होता. विशेष म्हणजे या रंगभूमीचा जन्म एलिझाबेथन अर्थात शेक्शपिरीयन रंगभूमीच्या प्रभावातून आणि इंग्रजांच्या सानिध्यात झाला होता. मराठी रंगभूमीवर या दोन्ही रंगभूमीचा प्रभाव बुकिश नाट्यपरंपरेपासूनच सुरू झाला होता. केशवरावांच्या काळात आगा हश्र कश्मीरी हे महान पारशी नाटककार अस्तित्वात होते. नाटककार म्हणूनही ते लोकप्रिय होते. त्या काळात त्यांना भारतीय शेक्सपियर म्हटले जात होते. शेक्सपियरची आणि शेक्सपिरीयन तंत्राची नाटके ते करीत. हा ओनामा गिरवतच इब्सेनीयन नाट्यतत्वाचे 'राक्षसीनुसार महत्वाकांक्षा' हे नाटक 'कमाले हिर्स' या नावाने हिंदी मिश्रित उर्दू भाषेत शेक्सपिरीयन नाट्यतंत्रात केशवरावांनी सादर केले होते.

या नाटकाच्या निमित्ताने केशवरावांनी त्यांचा स्वभाव आणि कार्यशैली बघता निश्चितच पारशी नाटकांचा अभ्यास केला होता. त्या काळात आगा हश्र कश्मीरी यांची शेक्सपियरची भाषांतरीत सफेद खून (किंग लियर), ख्वाब ऐ हस्ती (किंग जॉन), सैद ऐ हवस (विंटर्स टेल), खुबसूरत बला (मॅकबेथ) आणि शेक्सपियरीयन थाटाची भारतीबाला, रुस्तम ऐ सोहराब, यहुदी की लडकी ही नाटके खूप गाजत होती. 'खुबसूरत बला' या नाटकाने तर त्यांचेवर मोहीनीच घातली होती. 'कमाले हिर्स' नाटकाची प्रेरणा त्यांना याच नाटकाने दिली होती. उर्दू भाषेची नजाकत आणि रुतबा त्यांना हमखास आवडला

असेल. अर्थात ही पारशी नाटके त्यांनी बघितली होती, तेव्हाच ते पारशी पध्दतीचे उर्दू नाटक करण्यास प्रेरीत झाले होते. त्यांनी त्यासाठी उर्दू-हिंदीचा अभ्यास केला. त्यांची संवाद पध्दती, गीत-संगीत गायकीचे अनुकरण केले.

याच काळात चित्रपटाचे युग सुरू झाले होते. त्याचे आकर्षण वाढत होते. ते बघून केशवरावांनी चक्क प्रोजेक्टर वापरून नेपथ्यासाठी रेल्वे स्टेशन आणि रेल्वेच्या फलाटाच्या दृश्याचा उपयोग केला. म्हणजे त्याकाळातही अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग त्यांनी विशेषत्वाने केला. एकूणच रंगभूमीला काळाचे भान त्यांनी दिले. काळानुरूप नवी अभिरूची घडविण्याचा प्रयत्न केला. नव्या नाट्यतंत्र, नाट्यतत्वांचे स्वागत केले. नाट्यनिर्मितीचा नवा 'ड्रॉफ्ट' आणि नवे 'क्रॉफ्ट' त्यांनी रुजविले. केशवरावांची एकूणच सारी कारकिर्द अचंभित करणारी आहे. पण त्यांच्या कारकिर्दीचे खरे मूल्यमापन आजतागायत झाले नाही, हे वास्तव आहे.

●●●



**'संयुक्त मानापमान' नाटकात बालगंधर्व यांचे सोबत केशवराव भोसले**

# आधुनिक मराठी रंगभूमीचे शिल्पकार

**सं**गीतसूर्य केशवराव भोसले यांनी आपल्या केवळ २७ वर्षांच्या कारकिर्दीत आपल्या कर्तृत्वाने अजरामर असा इतिहास निर्माण केला. वयाच्या तिसऱ्या वर्षापासून स्वदेश हितचिंतक नाटक मंडळीत त्यांचे कठोर असे नाट्य प्रशिक्षण, संगीत प्रशिक्षण सुरू झाले. मंडळीचे मालक आणि त्याकाळचे प्रसिध्द नट जनुभाऊ निमकर यांच्या तालमीत ते तयार झाले. प्रसिध्द गायक आणि संगीत शिक्षक रामकृष्णबुवा वझे हे त्यांचे पहिले गुरु. एकतीस वर्षांच्या काळात त्यांनी ३१ नाटकातून सुमारे ५२ भूमिका यशस्वीपणे पार पाडल्या. वयाच्या १८ व्या वर्षी ललितकलादर्श नाटक मंडळ स्थापन करून एका गौरवशाली युगाचा प्रारंभही केला. पारंपरिक रंगभूमीच्या जोखडातून बाहेर पडून आधुनिक मराठी रंगभूमीची मुहूर्तमेढ रोवली. रंगभूमीला वास्तववादी रूप देण्याचे श्रेय

त्यांनाच द्यावे लागेल. गुणग्राहकता, प्रयोगशिलता, धोका पत्करण्याची वृत्ती, रंगभूमी संदर्भात लाभलेली दूरदृष्टी, जिद्द, समर्पण, त्याग, परिश्रम, स्वाभिमान, परोपकारी वृत्ती, संवेदनशिलता, परिपक्वता, वैचरिकता, बेडरपणा, दानशुरता, क्षत्रीय बाणा, व्यासंगी अभ्यासक, संशोधक, सामाजिक जाणिव, प्रभावी संघटक व नेतृत्व हे गुण त्यांना उपजतच लाभले होते. अनुभवांनी त्यांना अधिकच समृध्द आणि संपन्न केले.

कलावंत म्हणून ते स्वतःचीच वारंवार अग्निपरीक्षा घेत. सातत्याने आत्मपरीक्षण करण्याची सवय असल्याने आपल्या चुका ते तात्काळ दुरुस्त करीत. गायन-अभिनय हे त्यांचे पाहिले आणि शेवटचेही प्रेम होते. त्यातून रंगभूमी विषयीचा भक्तीभाव त्यांच्यात निर्माण झाला होता. तरीही त्यांनी आपला व्यावहारिकपणा कायम ठेवला. ते कलंदरवृत्तीचे होते, आवलिया होते पण कसोशीने शिस्त सुध्दा तेवढ्याच निर्धाराने पाळत. ते सश्रध्द होते पण अंधश्रध्द नव्हते. शिघ्रकोपी, फटकळ, स्पष्टवक्ते होते, पण त्यांनी कधी कुणाचा आजन्म राग केला नाही की कुणाचे नुकसानही. रंगभूमीच्या संदर्भात मात्र ते अत्यंत गंभीर होते, शिस्तप्रिय होते, सर्जनशील आणि प्रयोगशील होते. ते पट्टीचे खवैये होते. तिखट भाजी, कोल्हापुरी रस्सा, तळलेल्या मिर्च्या त्यांना आवडत. पण त्याचा कधीही आपल्या गायकीवर, अभिनयावर त्यांनी परिणाम होऊ दिला नाही. राजे-महाराजे एवढेच नव्हे तर देवापेक्षाही त्यांनी लोकांना, प्रेक्षकांना, रसिकांना माय-बाप मानले. राजाश्रय नाकारून लोका-श्रयाला प्राधान्य दिले. संधीचे सोने करणे त्यांना आवडत असे. कितीही कठीण प्रसंग आला तरी ते हार मानत नसत. हिमतीने, चिकाटीने त्या संकटावर ते मात करीत. समयसूचकता, प्रसंगावधान तर त्यांच्या स्वभावाचा विशेष गुण होता.

केशवराव भोसले अनेकार्थाने त्या समकालीनांपेक्षा वेगळे होते. त्यांचे वेगळेपण त्यांच्या रंगभूमीविषयक केलेल्या कार्यावरून स्पष्ट होते. सहकारी तत्व आणि लोकशाही पध्दतीने नाटक मंडळी वाढविणारा तो पहिला मालक होता. ललितकलादर्शची स्थापनाच मुळात २१ मालकांसह त्यांनी केली. आणि त्याचे नेतृत्वही मुळातच केशवरावांनी केले. त्यांच्या संघटन शैलीचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. किर्लोस्कर, कोल्हटकर, खाडीलकर आणि गडकरी या प्रस्थापित नाटककारांनी नाटक लिहून देण्याचे नाकारल्यानंतर नवीन लेखक उभे केले. वीर वामनराव जोशी, मामा वरेरकर, हिराबाई पेडणेकर (पहिल्या मराठी स्त्री नाटककार), धुंडिराज शेंबेकर, कमतनुरकर, य.ना. टिपणीस, आत्माराम दोंदे

अशी नाटककारांची एक फळी त्यांनी उभी केली. बापुराव पेंढारकर, नानासाहेब चाफेकर, रामचंद्र गुळवणी, कृष्णाजी आळतेकर, यशवंत पिंगळे, गंगाधर डवरी, गोपाळ गुत्तीकर, शंकर चाफेकर सारखे कलावंत घडवले. पेंटींगचा व्यवसाय करणाऱ्या आनंदराव मेस्त्री पेंटरचा कल्पकपणे उपयोग करून नेपथ्य कलेत क्रांती घडवून आणली. बाबुराव पेंटर, पु.श्री. काळे सारख्या चित्रकारांचा अभिनव पध्दतीने उपयोग केला. वास्तववादी नाटकांसोबत वास्तववादी नेपथ्य कलेचा वस्तुपाठ केशवरावांनी या चित्रकारांच्या मदतीने घालून दिला. अशा प्रकारचे नेपथ्य इतर नाटक मंडळ्यांना काय, पण गंधर्व नाटक मंडळीलाही करता आले नाही. एकूणच रंगभूमी संदर्भात अत्यंत लक्षवेधक अशा सुधारणा त्यांनी घडवून आणल्या.

रंगमंचावरील पहिला मखमली पडदा (ड्रॉप), वास्तववादी नेपथ्य, नाट्यगृहात घड्याळ लावण्याची आणि घोषित वेळेवरच नाटक सुरू करण्याचा शिरस्ता, प्रेक्षकांचे आदर आतिथ्य, यांत्रिक बेलचा उपयोग, गॅसबत्तीचा उपयोग, नवे जाहिरात तंत्र (हॅन्डबिल वाटणे), दवंडी देणे, ढोल-ताशा वाजवणे, भित्तीपत्रके लावणे, जाहिरातीसाठी विशिष्ट शब्द (टॅग लाईन), ओळींचा उपयोग करणे, आजच्या भाषेत त्याला जिंगल्स म्हणता येईल, अशा लघुगीतांचा किंवा नाट्यपदांचा उपयोग करणे, महिला नाटककाराचे नाटक निवडणे, गुरु संस्कारासाठी जाहिरपणे गंडा बांधणे, राजाश्रय नाकारून लोकाश्रय स्वीकारणे, मोठ्या नाटकांसोबत बाल प्रेक्षकांसाठी नाटक सादर करणे, सामाजिक विषयांवरची नाटके निवडणे, पडद्याला टाळीची उत्स्फूर्त परंपरा निर्माण करणे, 'एक - अंक एक दृश्य' आदी आधुनिक नाट्यतंत्राचा स्वीकार करणे, अशा कितीतरी सुधारणा, आणि नाविण्याचे श्रेय संगीतसूर्य केशवराव भोसले यांना द्यावे लागेल. आजच्या काळात एलसीडी स्क्रीन रंगमंचावर वापरला जातो तशाप्रकारे चक्क प्रोजेक्टरवरून मागील पडद्यावर फिल्म दाखविण्याचा विक्रमही केशवरावांनी त्याकाळी केला होता. ॲकॉस्ट्रीक तंत्राचेही त्यांना विशेष ज्ञान होते.

ओपन एअर थिएटर (मुक्ताकांशी रंगमंच) मध्ये शाहू महाराजांच्या आमंत्रण आणि व्यवस्थेवरून राजवाड्या नजीकच्या खास बागेत 'मृच्छकटीक' नाटकाचा जनता खेळ त्यांनी सादर केला होता. आजच्या महानाट्यासारखाच हा प्रकार होता त्यावेळी सुमारे २५ हजार नाट्यरसिकांनी या नाटकाचा आनंद लुटला. ओपन एअर थिएटरमध्ये नाट्यप्रयोग सादर करण्याचे श्रेय सुध्दा केशवरावांनाच जाते. षष्ठब्धी आणि चंद्रदर्शन सोहळा हा कर्तव्यपूर्ती आणि कर्तबगारीचा

सोहळा समजला जातो. परंतु वयाच्या केवळ २३ व्या वर्षीच मुंबईत विशेष नाट्य कारकिर्दीसाठी जंगी जाहीर सत्कार स्विकारण्याची संधीही केशवरावांना लाभली आहे. सर भालचंद्र भाटवडेकर, शेठ गोविंददास बनातवाले, सर हॉर्निमन, डॉ. आजगांवकर, डॉ. भडकमकर, पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर आणि गॅझेटियर ऑफ इंडियाचे संपादक गॉर्डेन सर यांच्या हस्ते केशवरावांचा सत्कार करण्यात आला होता. या प्रसंगी एका मोठ्या रकमेची थैली त्यांना अर्पण करण्यात आली. सत्कारस्थळीच ही थैली त्यांनी आपले गुरुवर्य जांभेकरबुवा यांना मंचकावर बोलावून त्यांना अर्पण करून टाकली. शाहू महाराजांच्या विचारसरणीनुसार नाटककार मामा वरेरकरांच्या मदतीने 'शंकराचार्य लोकनियुक्त हवा' असा प्रभावी संवाद आपल्या नाटकातून सादर केला. 'संन्यासाचा संसार' हे त्या नाटकाचे नांव. हा प्रयोग पहायला शाहू महाराजही उपस्थित होते. त्यांना हे नाटक आणि संवाद इतका आवडला की नाटक सुरू असतानाच त्यांनी डेव्हिडची भूमिका करणाऱ्या केशवरावांना चक्क रंगमंचावर जाऊन शाबासकीची थाप दिली आणि कडकडीत मिठीही मारली.

●●●



**शहा-शिवाजी नाटकात शिवाजी महाराजांच्या भूमिकेत**



**‘हाच मुलाचा बाप’ या नाटकातील गुलालच्या भूमिकेत केशवराव भोसले**

# अष्टपैलू संगीतसूर्य

**बा**लगंधर्वांवर त्याकाळी १ लक्ष ८४ हजार रुपयांचे कर्ज झाले. गंधर्व कंपनी कर्जाच्या ओझ्याखाली दबून गेली. केशवरावांना हे कळताच त्यांनी बालगंधर्वांची भेट घेतली. संयुक्त नाटकाचा प्रस्ताव ठेवला. यातूनच ऐतिहासिक आणि विक्रमी असा ‘संयुक्त मानापमान’ नाटकाचा प्रयोग साकारला गेला. प्रतिस्पर्धी असूनही बालगंधर्वांविषयी त्यांनी आपला आदर आणि स्नेह शेवटच्या क्षणापर्यंत कायम ठेवला. स्वतःच्या ललितकलादर्शलाही आर्थिक विपन्नावस्थेतून काढण्यासाठी त्यांना कर्ज काढावे लागले. पण कर्जफेडीच्या चिंतेने त्यांनी आपल्या कलावंतांना, सहकाऱ्यांना कधीही वेठीस धरले नाही. कर्ज फेडण्याची आणि पुन्हा कर्ज न घेण्याची त्यांची प्रतिज्ञा त्यांनी शेवटपर्यंत पाळली. मृत्यूपूर्वी अगदी सुस्थितीत ललितकलादर्श नाटक मंडळी त्यांनी बापुसाहेब पेंढारकरांना सोपविली. स्वतःचे नातेवाईक, वारसदार असतानाही ललितकलादर्शचे वारसदार म्हणून त्यांनी

बापुसाहेबांची निवड केली, याचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. दीर्घ मुदतीसाठी म्हणजे सहा महिन्यांसाठी मुंबईचे आघाडीचे 'बॉम्बे थिएटर' भाड्याने घेण्याचा विक्रमही त्यांचेच नावावर आहे. रंगभूमीवर संगीताच्या साथीला पारंपरिक वाद्यांसह तंतुवाद्य (तंतकार) त्यांनी सर्वप्रथम प्रयोगात आणले. नाटकाचे बिऱ्हाड हलवण्यासाठी, प्रयोगाला जाण्यासाठी स्पेशल ट्रेन बुक करण्याची प्रथाही त्यांनी सुरू केली. एकाच नाटकात एका पेक्षा अधिक म्हणजे चार-पाच भूमिका वठविण्याचे श्रेय सुध्दा त्यांना जाते. मोठ्या काठाच्या सरदारी खानदानी लुगड्यांचा वेशभूषेसाठी त्यांनी सर्वात प्रथम उपयोग केला.

'मानापमान' नाटकाचे सर्वाधिकार किर्लोस्कर कंपनीकडे होते. ते हक्क खुले होताच त्यावेळी एक हजार रुपयात केशवरावांनी प्रयोगाचे हक्क खरेदी केले आणि आठच दिवसात सर्व तयारी करून बॉम्बे थिएटरमध्ये त्याचा धडाकेबाज प्रयोग सादर करून त्यांनी आपली धमक सिध्द करून दाखविली. विशेष म्हणजे ही सर्व कामगिरी त्यांनी बालगंधर्व आणि त्यांची गंधर्व नाटक मंडळी लोकप्रियतेच्या आणि यशाच्या उच्च शिखरावर असताना करून दाखविली. असे कितीतरी विक्रम संगीतसूर्य केशवराव भोसल्यांच्या नावावर आहेत. नाटकाच्या बोर्डावर यशस्वी, लोकप्रिय आणि प्रमुख नटाचेच नाव झळकविण्याची परंपरा होती, परंतु हे भाग्य शारदा नाटकाच्या निमित्ताने वयाच्या दहाव्या वर्षीच केशवरावांना लाभले होते. मराठी नाटकासोबत पारशी नाटक मंडळ्याप्रमाणे 'कमाले हिर्स' या उर्दू नाटकाचा प्रयोगही त्यांनी त्याकाळी सादर केला होता. त्यासाठी खास आपल्या आवडीचे 'राक्षसी महत्वाकांक्षा' हे नाटक भाषांतरीत करवून घेतले होते. गायक, नट म्हणून त्यांचे मराठी सोबतच हिंदी, उर्दू आणि संस्कृत भाषेवर प्रभुत्व होते. जेव्हा की केशवरावांचे शालेय शिक्षण झाले नव्हते. प्रतिकूल परिस्थितीत ते घडले. विपरीत परिस्थितीत त्यांनी आपले नाट्यकर्तृत्व एका झंझावाताप्रमाणे सिध्द केले. गुणवत्ता यांनी नेहमीच महत्वाची मानली. त्याच्याशी कधी तडजोड केली नाही. 'बालगंधर्व युगात' 'संयुक्त मानापमान' नाटकात त्यांनी आपल्या जिद्दीने, परिश्रमाने खुद्द बालगंधर्वांना गायन, अभिनय कलेत मागे टाकले. त्यांना ना उमेद करण्यासाठी आलेल्या प्रेक्षकांना आपल्या केलेने मंत्रमुग्ध केले. या प्रयोगानंतर प्रेक्षकांनीच त्यांना उत्स्फूर्तपणे 'केशवाय नमः' म्हणत 'संगीतसूर्या'ची उपाधी बहाल केली.

●●●



**अनेकार्थाने प्रयोगशिल ठरलेल्या 'शहा-शहाची' या नाटकात शिवाजी राजांच्या भूमिकेत केशवराव भोसले**

# 'शहा शिवाजी' अखेरचे नाटक

**य.**ना. टिपणीस लिखित 'शहा शिवाजी' हे केशवरावांचे शेवटचे नाटक होते. १४ मे १९२१ रोजी पुण्यात या नाटकाचा प्रथम प्रयोग झाला. पण १ सप्टेंबर १९२१ रोजी झालेला 'शहा शिवाजी'चा प्रयोग शेवटचा ठरला. कारण विषमज्वराने (टाईफॉईड) त्यांचे ४ ऑक्टोबर १९२१ रोजी पुण्यात निधन झाले. आपण शिवाजी महाराजांवर नाटक करावे, त्यात शिवाजी महाराजांची भूमिका करावी, हे त्यांचे स्वप्न होते. या 'स्वप्नपूर्ती' नंतर लगेच त्यांनी जगाचा निरोप घेतला. वयाच्या चौथ्या वर्षापासून सुरू झालेली नाट्य कारकीर्द वयाच्या ३१ व्या वर्षी थांबली. केशवरावांचे हे नाटक अनेकार्थाने 'ड्रिम प्रोजेक्ट' होते. या नाटकाने भोसले कुळाची ऋण उतराई त्यांना करायची होती. या संदर्भात बाबूराव देशपांडे म्हणतात की, "त्यांनी केवळ शिवाजी महाराजांच्या भोसले कुळाचीच ऋण उतराई केली नाही तर दक्षिणेतल्या भोसले घराण्याचीही

ऋण उतराई केली. "तंजावरच्या भोसले कुलोत्पन्न सरफोजी राजाने महाराष्ट्राच्या बाहेर जी मराठी रंगभूमीची मुहूर्तमेढ रोवली त्याच भोसले घराण्याची नाट्यपताका हाती घेऊन मराठी नाट्यपंढरी केशवरावांनी निनादून सोडली." केशवराव छत्रपती शिवाजी महाराजांचे निस्सीम भक्त होते. ते स्वतःला अभिमानाने भोसले कुलात्पन्नही म्हणवून घेत. य.ना. टिपणीसांनी 'शहा शिवाजी' नाटक लिहिले असल्याचे कळताच त्यांनी खुद टिपणीसांकडे जाऊन नाटकाचे हक्क घेतले. खरे तर मुळात हे गद्य नाटक होते. पण रसिकांची मागणी आणि संगीताची जमेची बाजू लक्षात घेऊन त्याला संगीत नाटक केले. शिवाजी महाराजांच्या भूमिकेसाठी स्वतः तीन नाट्यपदे लिहिली. प्रयोगात ती प्रभावीरित्या गायली आणि 'गाणारे शिवाजी महाराज' हे चरित्र अजरामर केले. या नाटकात नेहमी प्रमाणे त्यांनी अनेक नवनवीन प्रयोग केले. 'बॉक्स सेट आणि फ्लॅट सीन'चा सर्वप्रथम प्रयोग त्यांनी या नाटकातून केला. 'गाणारे शिवाजी महाराज' तर त्याकाळचे सर्वात मोठे आकर्षक होते. शिवाजी महाराजांच्या तलवारीचे तेजच जणू केशवरावांच्या अभिनय आणि गायकीवर या नाटकात चढले होते. महाराजांच्या व्यक्तिमत्वानुसार नाट्यपदे, राग आणि चाली त्यांनी योजल्या होत्या.


केशवरावांनी या नाटकाच्या तालमी सुरू केल्या तेव्हा केशवराव गाणारा शिवाजी करीत आहे, असे कळल्यावर त्यांच्यावर टिकेचा कडेलोटही झाला. पण केशवरावांनी त्या टिकेकडे दुर्लक्ष तर केलेच पण टिकाकारांना प्रतिप्रश्नही केला. सुमंत जोशी आपल्या 'नाट्य निष्ठावंत' या लेखात लिहितात, "रंगभूमीवर श्रीकृष्ण, अर्जुन, भीष्म, दुर्योधन, दशरथ, सुभद्रा, रुख्मिणी, दौपदी ही चरित्रे गातात तर मग शिवाजी महाराज का नाही? त्यांचे गाणे का खटकावे?" पण त्याचे उत्तर कुणी देऊ शकले नाही. शहा-शिवाजी' नाटक एक यशस्वी ऐतिहासिक नाटक ठरले. या संदर्भात या नाटकाचे नाटककार य.ना. टिपणीस आपल्या प्रस्तावनेत म्हणतात, "शहा-शिवाजी हे मुळात गद्य नाटक पण ते संगीत रूपात आणण्याची इच्छा केशवरावांनी स्वतःच व्यक्त केली आणि त्यांनी ते तसे करवूनही घेतले." शांतिघना माणसा, खला तुला तुळचना, ये जगी हा प्रलयकाल, शिवाजी महाराजांच्या भूमिकेला शोभतील अशी तीन नाट्यपदे त्यांनी स्वतः रचली आणि आपल्या भारदस्त आवाजात गायली सुध्दा. स्वराज्याची संकल्पना शहाजी राजांनी शिवाजी महाराजाला कशी पटवून दिली आणि शिवाजी महाराजांनी ती कशी अंमलात आणली, यांचे वर्णन या नाटकात आहे.

मराठी रंगभूमीवर ऐतिहासिक नाटकाची परंपरा जरी १८६१ साली वि.ज. किर्तने यांनी लिहिलेल्या त्या "थोरले माधवराव पेशवे' या नाटकाने सुरू होत असली तरी १८७१ पर्यंत शिवाजी महाराजांना ऐतिहासिक नाट्यसृष्टित कोठेच स्थान मिळाले नव्हते. १८७१ साली शिवाजी महाराजांची भूमिका असलेले पण मुळात अफलजलखानाचे असलेले नाटक काशिनाथ महादेव थत्ते यांनी लिहिले. त्याचे नाव होते, 'अफझुलखानाच्या मृत्यूचा फार्स.' इतिहासाचा अपलाप, सत्याचा विपर्यास करणारे हे बालीश नाटक होते. धीर गंभीर, भारदस्त योध्दा, लढवय्या, स्वराज्य संस्थापक शिवाजी महाराजांना, यात चक्क फार्सिकल पध्दतीने सादर करण्यात आले होते. १८८४ साली शिवाजी महाराजांवर प्रथम बालनाट्य लिहिण्यात आले. नरहर सीताराम ढवळे हे या नाटकाचे लेखक होते. १८८० ते १९९० या काळात एकूण ७४ ऐतिहासिक नाटके रंगभूमीवर आलीत. त्यापैकी केवळ १३ नाटके शिवाजी महाराजांवर होती, तर पेशवाईवर २१ नाटके लिहिल्या गेली. शिवाजी महाराजांवर १९२० पर्यंत जी नाटके लिहिण्यात आली त्यातील बहुतेक नाटकात इतिहासाचा अपलापच करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर १९२१ साली केशवराव भोसले यांनी केलेले 'शहा-शिवाजी' या नाटकाने शिवाजी महाराजांच्या व्यक्तिरेखेला बऱ्यापैकी न्याय देण्याचा प्रयत्न केला. महत्वाचे म्हणजे केशवरावांनी आग्रहपूर्वक 'शहा-शिवाजी' नाटकाचा प्रपंच घडवून आणला होता.

●●●



**शहाजी राजेंच्या भूमिकेत वडीलबंधू**



**झाले बहु, होतील बहु पण या सम हात**

# ऐसा केशव पुन्हा न होणे!

**प**ड्याला टाळी आणि अभिनयासोबत गाण्यांना 'वन्समोर' मिळवण्यात केशवरावांचा हातखंडा होता. त्यासाठी त्यांचे नेहमीच कौतुक केले जाई. वयाच्या दहाव्या वर्षी संगीत शारदेत शारदेची अविस्मरणीय केलेल्या भूमिके नंतर कलावंताचे कर्दनकाळ म्हटले जाणारे स्वदेश हितचिंतक नाटक मंडळीचे मालक जनुभाऊ निमकरांनी मारलेली मिठी हे त्यांच्या आयुष्यातील पहिले कौतुक होते. ललितकलादर्शचे सर्वात यशस्वी नाटक 'राक्षसी महत्वाकांक्षा' म्हणजे 'मी नवबाला जोगन बनले' हे नाट्यगीत गायल्यावर प्रख्यात गायिका गौहरखान बाई यांनी देहभान हरपून हातातील हिऱ्याची अंगठी केशवरावांना बहाल केली होती. 'संन्यासाचा संसार' या नाटकात ख्रिस्ती डेव्हीडच्या भूमिकेत 'बा रे पांडुरंगा' हा अभंग केशवराव इतक्या तन्मयतेने गात की प्रेक्षकांचे डोळे पाणावले जायचे. पुढे अनेक भजनी मंडळीत, भजनांच्या कार्यक्रमात हा अभंग भजनकरी अग्रक्रमाने गात. ज्या गावात प्रयोग असेल त्या गावातील भजनी मंडळी केशवरावांचा हृदय सत्कार करीत असे.

'संयुक्त मानापमान' नाटकात 'धैर्यधरा'ची वेशभूषा केशवरावांनी स्वतःच 'डिजाईन' केली होती. 'धैर्यधराचे कपडे आणि डोईवरचा फेटा' इतका लोकप्रिय झाला होता की केशवरावांचा सन्मान म्हणून अनेक बँड मंडळांनी रंग बदलवून ही वेशभूषा करणे सुरू केले होते. प्रसंगी त्यांचे एखादे लोकप्रिय नाट्यपद ते बँडवर वाजवत. त्यांनी रूढ केलेली एक फॅशन म्हणून या घटनेकडे आपण बघू शकतो. अमरावतीला शिवजयंतीच्या कार्यक्रमाला ते आले असता कार्यक्रमात त्यांनी वीर वामनराव जोशी यांचे 'हे हिंदी देवी विजयिनी' हे गीत अत्यंत उत्स्फूर्तपणे सादर केले. खड्या, बुलंद आवाजात गायलेले हे 'राष्ट्रीय गीत' सर्वांनाच आवडले. दादासाहेब खापर्डे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. त्यांनी केशवरावांचे खूप कौतुक केले आणि शाबासकीही दिली.

'संयुक्त मानापमान' नाटकानंतर त्यांचेवर कौतुकाचा इतका वर्षाव झाला की, 'केशवाय नमः', 'संगीतसूर्य', 'गंधर्वाचा गंधर्व' म्हणून रसिक प्रक्षकांनी त्यांचे मनभरून कौतुक केले. बाबुराव देशपांडे त्यांना 'रंगभूमीसाठी झपाटलेला अवलिया' म्हणतात तर विद्याधर गोखले यांनी 'असा केशव पुन्हा न होणे' हे गौरवगीत लिहून त्यांना 'नटराजाचे भवानी खड्ग' म्हटले आहे. रामजी जोशी यांनी त्याचा उल्लेख 'मराठी रंगभूमीवरील 'चार चांदाचे सरदार' म्हटले आहे. केशवराव भोळे 'मदायत्तं तु पौरुषम्' म्हणून त्यांचा सन्मान करतात आणि दिनकर द. पाटील त्यांनी गणना आधुनिक रंगभूमीचे शिल्पकार म्हणून करतात. शरद पवारांनी त्यांना संगीत रंगभूमीच्या मुकुटातील कौस्तुभ म्हणून गौरविले आहे. अरुण गुजराथी यांनी त्यांची तुलना 'एकलव्या'शी केली आहे. गानसम्राट अल्लादिया, खाँ साहेब त्यांच्या गाण्यावर जाम फिदा होते. ते त्यांना 'बेटा जिंदा रहो' म्हणून आशीर्वाद देत. त्यांचे गुरु रामकृष्ण बुवा त्यांना 'बहाद्दर गायक' म्हणत असे.

वासुदेव खरे शास्त्री, दादासाहेब खापर्डे, पं. विष्णू दिगंबर पलुस्कर, आदींनीही त्यांचे भरभरून कौतुक केले आहे. गणपतराव जोशी त्यांना 'अस्सल कलावंत' म्हणत तर वसंत देसाई यांनी त्यांना 'तळपत्या सूर्याची' उपमा दिली आहे. पु. श्री. काळे यांनी त्यांचा उल्लेख रंगभूमीवर शास्त्रोक्त आणि नाट्यसंगीत गायनाची ध्वजा फडकवणारा गायक नट म्हणून अभिमानाने उल्लेख केला आहे. किर्लोस्कर मंडळीतले कलावंतही त्यांना 'नटवर्य' म्हणत. शंकरराव मुजुमदारांनी त्यांचा उल्लेख 'मर्दानी आवजाचा गवई' म्हणून केला आहे. तर

गोविंदराव टेंबे त्यांना 'कर्तबगार गायन-नट' म्हणत असे. गणपतराव बोडसाना 'ध्येयनिष्ठ' तर वरेरकरांना ते 'हरहुन्नरी' वाटत, म्हणून त्यांनी केशवरावांना 'गायकांचे आणि नायकांचे मुकुटमणी' म्हटलेले आहे. सुमंत जोशी त्यांचा उल्लेख 'नाट्य निष्ठेचा महामेरू' म्हणून करतात. मृत्यू लेख लिहिताना केशवरावांप्रती एका वृत्तपत्राने 'झाले बहू, होती बहू, परंतु या सम हाच' असे शिर्षक देऊन त्यांचा मरणोपरांत गौरव केला. बालगंधर्व आणि केशवराव जरी रुढार्थाने त्याकाळी प्रतिस्पर्धी असले तरी ते केशवरावांची शक्तीस्थळे जाणत म्हणून 'संयुक्त मानापमान' नाटकाची आठवण लिहितांना त्यांनी केशवरावांची प्रशंसा केली आहे. ते लिहितात, ''केशवराव हा शब्द ऐकला तरी माझ्या अंगावर काटा उभा राहतो. संयुक्त मानापमानाच्या प्रयोगात केशवरावांनी मला खाऊन टाकले. केशवरावांच्या पदाने मी नर्व्हस झालो.'' बालगंधर्व अतिशय महान गायक, नट होते. पण अगदी विनम्रपणे त्यांनी केशवरावांच्या शक्तीस्थळांचे आणि सामर्थ्याचे कौतुकच केले आहे. अत्यंत गौरवाने त्यांचा उल्लेख बालगंधर्वांनी 'नाट्यकलेचा कौस्तुभमणी', 'नाट्यकलेचा रत्नहार' असा केला आहे.

आपल्या नाट्यकलेतून, गायन कलेतून त्यांनी एक विशेष गौरव प्राप्त केला होता. प्रचंड लोकप्रियताही मिळविली. त्यांच्या अत्यंयात्रेतील गर्दीचा, चाहत्यांचा बालगंधर्वांनाही हेवा वाटला होता. त्यांच्या 'अस्थिकलश' दर्शनाची हकीगत लिहितांना नानासाहेब फाटक म्हणतात, ''लोकमान्य यांचा अस्थिचा कलश पुण्यात आणला गेला, त्यावेळी जितका जमाव मानवंदना करण्यासाठी जमला होता, तितक्याच जमावाने या प्रसंगी या कलावंताची 'अंतिम साथ' केली आणि आपले प्रेम व्यक्त केले.'' शाहू महाराज प्रेमाने त्यांना माझा केशा आणि सन्मानाने 'तळपती तलवार' म्हणत असे. अशा या कलंदर, हरहुन्नरी, अफलातून कलावंताला केवळ ३१ वर्षांचेच आयुष्य लाभले. पण या ३१ वर्षात शतकपूर्ती होईल इतके नेत्रदिपक, अचंबित करणारे कार्य फक्त त्यांनी पूर्ण केले. विद्याधर गोखले यांनी केशवरावांवर लिहिलेल्या गौरवगीतातील हे शब्द अतिशय समर्पक असेच आहे.

''अगा केशवा! तुझे तपोबल
बलशाली मन ध्येय दिवाणे
दिसे न कोठे म्हणूनी वदतो
ऐसा केशव पुन्हा न होणे!

●●●



**१९९० साली महाराष्ट्र सरकारने प्रसिध्द केलेला**
**लोकराज्यचा संगीतसूर्य विशेषांक**

# उपलब्ध चरित्र साधने

**मी** केशवराव भोसल्यांचे चरित्र लिहिण्याचा संकल्प केला तेव्हा असे लक्षात आले की, त्यांच्या चरित्र साधनांचा खूपच अभाव आहे. अलिकडचे सगळ्यात मोठे स्त्रोत म्हणजे महाराष्ट्र सरकारचे मुखपत्र असलेल्या 'लोकराज्य'ने ऑगस्ट १९९० मध्ये काढलेला 'संगीतसूर्य केशवराव भोसले विशेषांक'. यात तुलनात्मकदृष्ट्या भरपूर माहिती आहे. पण हा अपवाद वगळता इतर साधनांचा मात्र फारसा अभाव आहे. 'लोकराज्य'नेच १९८७ साली 'बालगंधर्व जन्मशताब्दी विशेषांक' प्रकाशित केला आहे, पण या अंकातून केशवरावांबद्दल फारशी काही माहिती हाती पडत नाही. आत्माराम सावंत आणि डॉ. सतीश पावडे यांनी लिहिलेले तसेच डॉ. राजीव चव्हाण यांनी संपादित केलेली छोटेखानी चरित्रपर पुस्तके उपलब्ध आहेत. पण त्याचेही मूळ स्त्रोत लोकराज्यचा संगीतसूर्य केशवराव भोसले हाच विशेषांक आहे. गुगल साईटवर काही लेख आढळतात

खरे, पण त्यातही नाविण्य नाही. तीच तीच माहिती पुन्हा आली आहे.

राक्षसी महत्वाकांक्षा, ऋतूध्वज मदालसा, दामिनी, शहा-शिवाजी, संयुक्त मानापमान, संन्यासाचा संसार याच काही निवडक नाटकातील छायाचित्रे, धैर्यधर आणि त्यांचे एक प्रोफाईल छायाचित्र आणि त्यावर आधारित दोन तैलचित्रे तसेच कोल्हापूर येथील एक अर्धाकृती पुतळा आज उपलब्ध आहेत. लहानपणची दोन छायाचित्रे ज्यात एकामध्ये जनुभाऊ निमकर आणि रामकृष्णबुवा वझे यांचे सोबत ते उभे आहेत ती उपलब्ध आहेत. या दोन छायाचित्रांना मात्र दुर्मिळ म्हणता येईल. डॉ. राजीव चव्हाण यांच्या पुस्तकात त्यांच्या दुसऱ्या पत्नीसोबतचे एक दुर्मिळ छायाचित्र आढळते. याशिवाय लोकराज्याच्या अंकात ज्या घरात त्यांचा जन्म झाला, त्याचे छायाचित्र उपलब्ध आहे. याशिवाय मराठी रंगभूमी आणि संगीत मराठी रंगभूमीशी संबंधित लिहिण्यात आलेल्या विविध ग्रंथात अत्यंत त्रोटक माहिती उपलब्ध आहे. पण संगीतसूर्यांचे समग्र, साद्यंत चरित्रग्रंथ सिध्द करायचा असेल तर अशा संबंधित अनेक ग्रंथाचा गांभीर्याने अभ्यास होण्याची गरज आहे. समकालीनांची चरित्रे, आत्मचरित्रे शोधण्याची गरज आहे. 'गॅझेट'सारख्या शासकीय दस्तावेजांची तपासणी होणे गरजेचे आहे. याशिवाय ललितकलादर्श नाटक मंडळींची जुनी कागदपत्रे, रेकॉर्ड, दस्तावेज संकलित करून आणखी नवी माहिती उजेडात आणण्याचे प्रयत्न झाले पाहिजे.

संगीतसूर्य केशवरावांनी आपल्या ३१ नाटकातील ५२ भूमिकेसाठी अनेक पदे गायली. पण त्यांची पदे, ध्वनिमुद्रिका आज उपलब्ध नाही. युट्यूबवर मात्र 'मूकनायक'मधील दोन पदे 'होय संसार' आणि 'अवचित गेले किंकर करि' उपलब्ध आहेत, पण त्याचे रेकॉर्डिंग चांगले नाही. त्यातील शब्द नीट ऐकू येत नाही. शिवाय ही पदे केशवरावांचीच आहे का याबद्दलही खात्री नाही.

केशवराव भोसले यांनी आपली १२ गाणी जार्ग वाल्टर डिलनट, हैद्राबाद यांच्या मदतीने रेकॉर्ड केल्याचा संदर्भ सापडतो. यात 'सौभद्र'मधील एक, 'रामराज्य वियोगा'तील एक, 'शारदा'मधील एक, 'शाकुंतल'मधील एक आणि 'मूकनायक'मधील दोन नाट्यपदांचा समावेश आहे. याशिवाय राग जोगीया, राग बागेश्री, राग भीमपलास आणि मिश्र राग यामधील पाच बंदिशी याचा समावेश असल्याचे कळते. युट्यूबवर सद्या उपलब्ध 'मूकनायक' या नाटकातील दोन पदे उपरोक्त उल्लेख केलेलीच दोन पदे आहेत की काय? अशी शंका उपस्थित होते. पण याबद्दल खात्रीदायक माहिती उपलब्ध नाही. शिवाय जॉर्ज

वाल्टर डिलनट याच्या सहकार्याने केलेले रेकॉर्डिंगही आज उपलब्ध नाही किंवा त्याबद्दल आणखी काही माहिती उपलब्ध नाही.

फेसबुकवर 'संगीतसूर्य केशवराव भोसले' नावाचे पेज आहे. त्यावर बरीच माहिती आहे पण त्यातही नाविण्य नाही. मात्र अजय एस. मांजरेकर यांनी बरीच माहिती उपलब्ध करून दिली आहे. ते या फेसबुकवरून प्रामाणिकपणे विविध प्रकारची चरित्र साधने प्रस्तुत करण्याचे कार्य करीत आहेत. २०११ पासून आजपर्यंत या ग्रुपला केवळ ५३६ लाईक्स मिळाले आहेत. यादृष्टीने येथेही 'संगीतसूर्य केशवराव भोसले' उपेक्षाच सहन करीत आहेत. मराठा सेवा संघ प्रणित 'संगीतसूर्य केशवराव भोसले सांस्कृतिक परिषदने' नव्याने त्यांच्या चरित्र साधनांचा शोध घेणे सुरू केले आहे, ही आनंदाची बाब आहे. २०२० साली डॉ. सतीश पावडे यांच्या संयोजनात दहा व्याख्यानांची एक मालिका संगीतसूर्य केशवराव भोसले सांस्कृतिक परिषदेने आयोजित केली होती. पण त्यातून केवळ उपलब्ध माहितीच मांडण्यात आली. एकूणच केशवराव भोसले यांचेवर आणखी अकादमिक संशोधन होण्याची गरज आहे.

●●●



**जनुभाऊ निमकर यांच्या सोबत दत्तोबा आणि केशवराव**

# ललितकलादर्शचा नटवर्ग

१) केशव विठ्ठल भोसले, २) दत्तात्रय विठ्ठल भोसले, ३) गणेश विनायक वीरकर, ४) मारुतीराव पवार, ५) कृष्णराव पवार, ६) केशव विष्णु बेडेकर, ७) गोपाळराव काशीकर, ८) केशव रामकृष्ण शितूत, ९) कृष्णराव पेटकर, १०) गंगाधर डवरी व ११) त्यांचे बंधु, १२) कृष्णाजी बाबा आळतेकर, १३) मोघे कवि (ग्वाल्हेर), १४) आबा धारवाडकर, १५) वामनराव करमेळकर (महाड), १६) सोनबा वालावलकर (सावंतवाडी), १७) सदाशिवराव रानडे, १८) देवधर (नाशिक), १९) रामचंद्र कुशाबा गुळवणी, २०) श्रीपाद विष्णु जोशी, २१) पांडोबा खेर, २२) पांडुरंग आत्माराम सानेमामा, २३) रघुनाथ गोविंद शितूत, २४) रघुनाथ अण्णाजी इनामदार, २५) विश्वनाथ हरि पळणीकर, २६) रामा हनगंडीकर, २७) महादेव बाळकृण वालावलकर, २८) दामुअण्णा मालवणकर, २९) रामभाऊ डवरी, ३०) दत्तोपंत कुळकर्णी-टोपकर, ३१) रा. अभ्यंकर, ३२) नारायण गणेश विजापुरकर, ३३) व्यंकटेश बळवंत पेंढारकर, ३४) यशवंत विठ्ठल पिंगळे, ३५) आ.ना. झरापकर, ३६) श्रीधर महादेव देशमुख, ३७) विष्णु महादेव देशमुख, ३८) लहानुसाव कोष्टी, ३९) गोपाळ वासुदेव गुत्तीकर, ४०) नियोगी (शहापूर), ४१) बाळा सामंत (कुडाळ), ४२) नरहरी कानडे, ४३) शंकर नारायण जोशी, ४४) कृष्णा आगरवाले, ४५) शंकर नीळकंठ चाफेकर.

**व्यवस्थापक :**

१) केशव रामकृष्ण शितूत (मुख्य व्यवस्थापक)
२) बाबुराव तिरोडकर
३) गोविंद नारायण सोळस्कर
४) घोटकर.

**हार्मोनियम वादनकार :**

१) मारुतीराव पवार
२) दत्तोबा तारदाळकर
३) दत्तात्रय गोपाळ जोशी
४) गणपत केशव काळसेकर.

●●●

# संगीतसूर्य यांच्या गाजलेल्या भूमिका

| | |
|---|---|
| १) रामराज्य वियोग | - **भारत-शंबूक** |
| २) संशय संभ्रम | - **राजपूत्र** |
| ३) हरिश्चंद्र | - **रोहिदास** |
| ४) मृच्छकटीक | - **वसंतसेना** |
| ५) बाजीराव मस्तानी | - **शमशेर बह** |
| ६) राजाराम | - **शाहू** |
| ७) तरुणी शिक्षण | - **पोऱ्या** |
| ८) अक्षविपाक | - **नारद** |
| ९) प्रबळयोगीनी | - **चंदा/शरदि** |
| १०) शापसंभ्रम | - **महाश्वेता** |
| ११) मूकनायक | - **सरोजिनी** |
| १२) चंद्रहास | - **विषदा** |
| १३) मोहना | - **मोहना** |
| १४) सं. सौभद्र | - **सुभद्रा** |
| १५) राक्षसी महत्वाकांक्षा | - **मृणालिनी** |
| १६) सं. मानापमान | - **धैर्यधर** |
| १७) हाच मुलाचा बाप | - **गुलाब** |
| १८) शहा-शिवाजी | - **शिवाजी** |
| १९) संन्याशाचा संसार | - **डेव्हीड** |
| २०) संयुक्त सौभद्र | - **अर्जुन** |
| २१) मुद्रीका | - **मुद्रीका** |
| २२) सं. शाकुंतला | - **शाकुंतला** |
| २३) अभिज्ञान शाकुंतलम | - **प्रियंवदा** |
| २४) शीघ्र सुधारणा | - **दुष्परिणाम** |
| २५) सं. गोपीचंद | - **गोपीचंद** |
| २६) सं. दामिनी | - **दामिनी** |
| २७) सं. ऋतूराज मदालसा | - **मदालसा** |
| २८) सं. व्रतपालन | |
| २९) सं. विद्याहरण | - **विद्या** |
| ३०) कमाले हिर्स (उर्दू) | |
| ३१) संगीत चंद्रसेना | - **चंद्रसेना** |




# समकालिन दिग्गज (छायाचित्रे)


बालगंधर्व


जनुभाऊ


दत्तोबा


वरेरकर


वीर वामनराव जोशी


हिराबाई पेडणेकर


शाहू महाराज


बाबुराव पेंढारकर


दत्तोपंत जांभेकर


आनंदराव पेंटर


बाबुराव पेंटर


केशव शितुत


भालचंद्र पेंढारकर

# संगीतसूर्य केशवराव भोसले यांचा जीवनपट

| | |
|---|---|
| ९ ऑगस्ट १८९० | : कोल्हापूर येथे सकाळी १० वाजता जन्म. |
| जून १८९३ | : मातोश्री जनाबाई केशवराव व त्यांचे वडीलबंधू दत्तोपंत सह जनूभाऊ निमकरांच्या 'स्वदेश हितचिंतक नाटकमंडळी'च्या बिऱ्हाडीत दाखल. |
| १८९४ | : ना.बा. कानिटकर लिखित 'बाजीराव आणि मस्तानी'मध्ये समशेर बहादुरची भूमिका करून रंगभूमीवर चौथ्या वर्षी पदार्पण. |
| १९०० | : बार्शी मुक्कामी गो.ब. देवलांच्या 'शारदा' नाटकात शारदेची भूमिका करण्याची संधी, गोड आवाजाचे संगीत बालनट म्हणून ख्याती. |
| १९०२ | : कंपनीच्या बिऱ्हाडीच दत्तोपंत जांभेकरबुवांकडे रीतसर संगीत शिक्षण सुरू. |
| १९९६ | : स्वदेश हितचिंतक नाटक मंडळीत एक आण्याची भागीदारी, आवाज फुटतो. |
| १९०७ | : भागीदारीत एक आण्यापासून तीन आणे वाढ, परंतु असंतुष्ट. |
| १ जाने. १९०८ | : सिद्धारूढ स्वामींच्या आशीर्वादाने हुबळी येथे 'ललितकलादर्श नाटक मंडळी'ची स्थापना. स्वदेश हितचिंतक मधून फुटून बाहेर पडलेल्या व्यक्तींसह एकूण मालक एकवीस. |
| ४ जाने. १९०८ | : ललितकलादर्शचा पहिला खेळ 'सं. सौभद्र' हुबळीतील गणेशपेठ थिएटर मध्ये सादर. |
| १९०८ | : पुण्याचे पोलीस जमादार विठोबा मल्हारी चव्हाण यांची कन्या हौशाबाई हिच्याबरोबर पुणे येथे विवाह. पत्नीचे लग्नानंतरचे नाव सावित्री. |
| १९१० | : केशवराव आणि त्यांचे बंधू दत्तोपंत एवढेच ललितकलादर्शचे मालक राहतात. |
| १२ सप्टें. १९१० | : 'सं. सौभद्र' नाटकाचा पुणे येथे खेळ करून केशवरावांचे |

पुणेकर रसिकांवर अधिराज्य.

१९११ : जुन्या प्रथितयश नाटककारांच्या नकारा नंतर केशवराव नवीन नाटककार शोधून काढतात. ललितकलादर्शतर्फे रामचंद्र आत्माराम दोंदे यांचे 'सं. ऋतूराज मदालसा' आणि हिराबाई पेडणेकर यांनी लिहिलेले 'सं. दामिनी' ही नाटके नाशिक मुक्कामी सादर, दोन नाटकांच्या नेपथ्य व पडद्यांसाठी आनंदराव मेस्त्री व बाबुराव पेंटर यांची योजना.

२० सप्टें. १९१३ : वामन गोपाळ जोशी यांच्या 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' या नाटकाचा प्रथम प्रयोग मुंबई येथील बॉम्बे थिएटरात. या प्रयोगाच्या निमित्ताने मखमलीचा पडदा मराठी रंगभूमीवर प्रथमच अवतीर्ण.

डिसेंबर १९१३ : गॅझेट ऑफ इंडियाचे एडिटर गॉर्डन यांच्या हस्ते केशवरावांचा सुवर्णपदक, महावस्त्र व मानपत्र मिळून सत्कार. विष्णु दिगंबर यांचे केशवरावांच्या गानकौशल्याबद्दल गौरवपर भाषण. केशवरावांकडून सर्व सत्कार गुरुवर्य जांभेकरबुवांच्या चरणी समर्पित.

मे १९१४ : कंपनीतील पंचवीसजण एकदम फुटून बाहेर पडल्यामुळे विस्कटलेली घडी पारोळे मुक्कामी 'बाल-सौभद्र', 'बाल-मृच्छकटिक' आदी प्रयोग करून पुनः व्यवस्थित.

नोव्हेंबर १९१४ : कंपनीचा मुक्काम हलताना स्पेशल ट्रेनचा सर्वप्रथम वापर.

डिसेंबर १९१५ : मलकापुरातील धुंडिराज रंगनाथ शेंबेकर यांचे 'सं. व्रतपालन' नाटक रंगभूमीवर, याच महिन्यात 'सं. मानापमान' नाटकाच्या प्रयोगाचे हक्क शंकराराव मुजुमदारांकडून एक हजार रुपयांना मिळवून आठ दिवसात मुंबईतील बॉम्बे थिएटरात प्रयोग. याच सुमारास गुरु रामकृष्णबुवा वझे यांचे गंडाबंधन.

मे १९१६ : अमेरिकेहून मागविलेली मोटारसायकल साईडकारसह पणजीत येते. केशवरावांना पेंढारकरांकडून ड्रायव्हींगचे शिक्षण.

डिसेंबर १९१६ : कोल्हापूर मुक्कामात मिळालेला सर्व पैसा दानधर्म, संस्थांना

देणग्या व अंबाबाईच्या देवळाची शिखरे पाजळण्यात खर्च.

जानेवारी १९१७ : पत्नी सावित्रीबाई यांचे अमरावती मुक्कामात प्लेगने निधन. याच सुमारास वडील बंधू दत्तोपंत यांना त्यांचा वाटा देऊन केशवराव ललितकलादर्शचे एकमेव मालक.

१ एप्रिल १९१७ : पुणे येथील हितचिंतक मंडळींकडून 'मराठा'चे संपादक न.चिं. केळकरांकडून किर्लोस्कर संगीत नाट्यगृहात मानपत्र प्राप्त.

ऑगस्ट १९१८ : इंदूरच्या नारायण लोंढ्यांच्या कन्या कृष्णाबाई हिच्याशी दुसरा विवाह. त्यांचेही लग्नानंतरचे नाव सावित्रीच ठेवले.

७ सप्टेंबर १९१८ : नागपूर येथील तुलसीराम थिएटरात मामा वरेरकर आपले 'हाच मुलाचा बाप' हे गद्य नाटक संगीत करून केशवरावांना दुसऱ्या लग्नाप्रित्यर्थ अहेर म्हणून समर्पित करतात.

२५ सप्टें. १९१९ : मुंबईतील व्हिक्टोरिया थिएटरात मामा वरेरकरांच्या 'सं. संन्याशाचा संसार' या नाटकाचा प्रथम प्रयोग. केशवराव डेव्हिडच्या अविस्मरणीय भूमिकेत.

डिसेंबर १९१९ : 'ह्यापुढे केशवराव रंगभूमीवर दिसणार नाहीत' अशा जाहिराती झळकू लागतात.

३ फेब्रु. १९२० : छत्रपती शाहू महाराजांच्या विनंतीवरून कोल्हापूर येथील पॅलेस एरियात 'सं. मृच्छकटिक' नाटकाचा पहिला ओपन एअर प्रयोग.

१४ मे १९२१ : य.ना. टिपणीस लिखित 'सं. शहा शिवाजी' नाटकाचा पुण्यात प्रथम प्रयोग, केशवराव छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमिकेत.

८ जुलै १९२१ : मुंबई येथील बालीवाला थिएटरात बालगंधर्वांबरोबर संयुक्त मानापमानात धैर्यधर आणि पुढे संयुक्त सौभद्रात अर्जुनाची भूमिका.

१ सप्टें. १९२१ : 'शहा शिवाजी' नाटकात रंगभूमीवर शेवटची भूमिका.

४ ऑक्टो. १९२१ : सायंकाळी साडेपाच वाजता पुणे येथे विषमज्वराने जीवनयात्रा समाप्त.

●●●

# संदर्भग्रंथ सूची


१. मराठी नाट्यपद : स्वरूप आणि समीक्षा - डॉ. अ.द. वेलणकर, प्रकाशक सौ. सुधा अरुण वेलणकर, नागपूर, प्र. आ. - मार्च १९८६.

२. नाट्यदर्शन : डॉ. सुनील सुभेदार, मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, प्र.अ. १९८१.

३. मराठीचा नाट्य संसार : वि.स. खांडेकर, देशमुख आणि कंपनी, पुणे.

४. लोकनाट्याची परंपरा : वि.कृ. जोशी, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९६१.

५. लोकराज्य : बालगंधर्व जन्मशताब्दी विशेषांक - संपादक दिवाकर गंधे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई, अंक-१२, नोव्हेंबर १९८७.

६. लोकराज्य : (संगीतसूर्य श्री. केशवराव भोसले विशेषांक) संपादक दिवाकर गंधे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई, अंक-७, ऑगस्ट १९९०.

७. संगीतसूर्य - डॉ. सतीश पावडे, साहिल मिडिया पब्लिकेशन्स, अमरावती, प्र.आ. नोव्हेंबर २००४.

८. संगीतसूर्य केशवराव भोसले : देशभक्त पुरोगामी नाट्य संपादक - डॉ. राजीव चव्हाण, सिंहवाणी प्रिंटर पब्लिशर्स, कोल्हापूर, प्र.आ. २००९.

९. मराठी नाटक : नाटककार : काळ आणि कर्तृत्व - डॉ. वि.भा. देशपांडे, दिलीपराज प्रकाशन, प्रा.लि., पुणे, खंड-२, प्र. आ. २००८.

१०. नाट्य मंथन : डॉ. चंद्रकांत धांडे, किर्ती प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २००३.

११. भारतीय नाट्यप्रयोग विज्ञान : अ.म. जोशी, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वि. आ. १९९९.


१२. मराठी रंगभूमीचे प्रारंभपर्व : डॉ. रुस्तम अचलखांब, वर्षा प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २००७.


१३. स्त्री नाटककारांची नाटके : डॉ. मधुरा कोरान्ने, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र. आ. २००२.


१४. समकालीन मराठी रंगभूमी : संपादक डॉ. राजेंद्र नाईकवाडे, डॉ. राजन जयस्वाल, विजय प्रकाशन, नागपूर, प्र. आ. २०१०.
१५. स्त्री नाटककारांचे योगदान : डॉ. सुधा पेशकर, विसा बुक्स, नागपूर, प्र. आ. २०१०.
१६. शहा-शिवाजी : य.ना. टिपणीस, प्रकाशक य.ना. टिपणीस, पुणे, प्र. आ. १९२०.
१७. माझा नाटकी संसार : ममा वरेरकर.


●●●


# डॉ. सतीश पावडे यांनी लिहिलेले चरित्र ग्रंथ




















# डॉ. सतीश पावडे यांची साहित्य संपदा

| क्र. | शीर्षक | प्रकाशक | वर्ष |
|---|---|---|---|
| १. | संगीतसूर्य केशवराव भोसले<br>आधुनिक मराठी रंगभूमीचे शिल्पकार | अविशा प्रकाशन, नागपूर | २०२० |
| २. | रंग विमर्श (समीक्षा) (हिंदी) | आकार पब्लिकेशन, नागपूर | २०२० |
| ३. | त्या सायंकाळची गोष्ट (रुपांतर) | नभालय प्रकाशन, अमरावती | २०१९ |
| ४. | द थिएटर ऑफ द ॲब्सर्ड (समीक्षा) | विजय प्रकाशन, नागपूर | २०१८ |
| ५. | नाट्य प्रसंग (समीक्षा) | आकार पब्लिकेशन, नागपूर | २०१८ |
| ६. | जय भीम-जय भारत (संपा. फोटो बुक) | आकार पब्लिकेशन, नागपूर | २०१८ |
| ७. | अंधार पाहिलेला माणूस :<br>लोकसंत गाडगेबाबा (नाटक) | पायगुण प्रकाशन, अमरावती | २०१७ |
| ८. | ढिगारा (नाटक) | नभ प्रकाशन, अमरावती | २००८ |
| ९. | जिजाऊ मांसाहेब (चरित्र) | साहिल मीडिया प्रकाशन, अमरावती | २००८ |
| १०. | शिवकल्याणी माँ जिजाऊ (नाटक) | नभ प्रकाशन, अमरावती | २००८ |
| ११. | गाडगेबाबांचे अखेरचे कीर्तन (समीक्षा) | नभ प्रकाशन, अमरावती | २००७ |
| १२. | आद्य मराठी नाटक तृतीय रत्न (समीक्षा) | नभ प्रकाशन, अमरावती | २००७ |
| १३. | त्या एका क्षणी (भाषांतर) | पुष्प प्रकाशन, पुणे | २००६ |
| १४. | शिवकुलभूषण राजा संभाजी (नाटक) | साहिल मीडिया प्रकाशन, अमरावती | २००५ |
| १५. | संगीत सूर्य केशवराव भोसले (चरित्र) | साहिल मीडिया प्रकाशन, अमरावती | २००४ |
| १६. | लोकसंत गाडगेबाबा (चरित्र) | मॅकमिलन प्रकाशन, पुणे | २००३ |
| १७. | चक्रव्यूह (एकांकिका) | अक्षय प्रकाशन, पुणे | २००१ |
| १८. | फास (एकांकिका) | अक्षय प्रकाशन, पुणे | २००१ |
| १९. | अंधारवेणा (एकांकिका) | अक्षय प्रकाशन, पुणे | २००१ |
| २०. | क्रांतयोगी गाडगेबाबा सहलेखक (नाटक) | ऋचा प्रकाशन, नागपूर | १९९९ |
| २१. | युग निर्माता -<br>डॉ. पंजाबराव देशमुख (नाटक) | नभ प्रकाशन, अमरावती | १९९७ |
| २२. | नाट्यचर्चा | समीक्षा | आगामी प्रकाशन |
| २३. | मराठी रंगभूमी आणि ॲब्सर्ड थियेटर | समीक्षा | आगामी प्रकाशन |

# डॉ. सतीश पावडे यांना मिळालेले पुरस्कार

| क्र. | शीर्षक | संस्था / प्रतिष्ठान | वर्ष |
|---|---|---|---|
| १. | * उत्कृष्ट संशोधन ग्रंथ | विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर | २०२० |
| २. | * उत्कृष्ट साहित्य निर्माण पुरस्कार | महाराष्ट्र सरकार | २०२० |
| ३. | * विशेष उल्लेखनिय लेखन पुरस्कार | विदर्भ साहित्य संघ, नागपूर | २०२० |
| ४. | * उत्कृष्ट नाट्य समीक्षा पुरस्कार | सूर्यकांतादेवी पोटे चॅरिटेबल ट्रस्ट, अम. | २०१९ |
| | **(* थिएटर ऑफ द ॲब्सड या नाट्य समिक्षा ग्रंथासाठी)** | | |
| ५. | श्रमिक विश्व नाट्यगौरव पुरस्कार | कामगार संघटना संयुक्त कृती समिती, वर्धा | २०१९ |
| ६. | श्रेयस नाट्यगौरव पुरस्कार | श्रेयस वाचनालय, हिंगणाघाट | २०१८ |
| ७. | सर्वोत्कृष्ट नेपथ्यकार पुरस्कार (गल्ली या नाटकासाठी) | राज्य नाट्य महोत्सव, अमरावती केंद्र | २०१६ |
| ८. | उत्कृष्ट शिक्षक सन्मान | म.गां. आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा | २०१५ |
| ९. | वाङ्मय सेवा पुरस्कार | वाङ्मय सेवा प्रकाशन, नाशिक | २००९ |
| १०. | ज्ञानतपस्वी डॉ. श्रीकांत जिचकार सन्मान | डॉ. श्रीकांत जिचकार प्रतिष्ठान, अमरावती | २००९ |
| ११. | राष्ट्रमाता जिजाऊ पुरस्कार | जिजामाता सेवाभावी संस्था, नांदेड | २००८ |
| १२. | 'पीपल्स कनेक्ट'साठी नामांकन | रिलायन्स कम्युनिकेशन, मुंबई | २००७ |
| १२. | पु.भा. भावे नाट्य समीक्षा पुरस्कार | पु.भा. भावे प्रतिष्ठान, मुंबई | २००४ |
| १३. | मामा वरेरकर उत्कृष्ट नाट्यलेखन पुरस्कार | सांस्कृतिक वाचनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई | |
| १४. | उत्कृष्ट नाट्यलेखन पुरस्कार | कामगार कल्याण मंडळ, मुंबई | २००२ |
| १५. | कलागौरव पुरस्कार | युनेस्को क्लब्स, विदर्भ | २००१ |
| १६. | उत्कृष्ट नाट्यलेखन पुरस्कार | कामगार कल्याण मंडळ, महा. अकोला | २००० |
| १७. | उत्कृष्ट नाट्यलेखन पुरस्कार | कामगार कल्याण मंडळ, महा. अकोला | १९९९ |
| १८. | उत्कृष्ट नाट्यलेखन पुरस्कार | कामगार कल्याण मंडळ, महा. अकोला | १९९८ |
| १९. | नाट्य गौरव अवार्ड | नेहरू युवा केंद्र, अमरावती | १९९७ |
| २०. | नाट्याचार्य सोन्याबापू पुरस्कार | सोन्याबापू प्रतिष्ठान, अमरावती | १९९७ |
| २१. | मग्नम ऑनर अवार्ड | मॅग्नम फाऊंडेशन, अमरावती | १९९६ |
| २३. | स्मिता पाटील स्मृती पुरस्कार | मानव मंदिर, नागपूर | १९९५ |



## भारतीय रंगभूमीचेही संगीतसूर्य.....

महान गायक, नट, नाट्य दिग्दर्शक, नाट्य निर्माता तसेच ललितकलादर्श नाटक मंडळीचे संस्थापक संगीतसूर्य केशवराव भोसले हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण भारतीय रंगभूमीचे संगीतसूर्य आहेत. आधुनिक मराठी आणि भारतीय रंगभूमीच्या इतिहासात त्यांची कामगिरी ही नेत्रदिपक आहे. तरीही त्यांना आजन्म उपेक्षा सहन करावी लागली. आजही तुलनात्मक दृष्ट्या त्यांच्याबद्दल विशेष माहिती उपलब्ध नाही. या पार्श्वभूमीवर डॉ. सतीश पावडे यांनी लिहिलेला ''संगीतसूर्य केशवराव भोसलेः आधुनिक मराठी रंगभूमीचे शिल्पकार'' हा चरित्र ग्रंथ अत्यंत महत्त्वाचे ठरले. ''संगीतसूर्यांच्या बद्दल संपूर्ण माहिती संबंधित छायाचित्रांसह त्यांनी उपलब्ध करून दिली आहे. हा ग्रंथ नाटककार, नाट्य निर्माता, गायक, अभिनेता, नाट्य रसिक, वाचक, प्रेक्षकांना तसेच नव्या पिढीच्या कलावंतांना निश्चित उपयोगी पडेल, असा विश्वास वाटतो.

▪ खासदार – अमोल कोल्हे

(प्रसिद्ध चित्रपट, दूरदर्शन आणि नाट्य अभिनेता)



## 'संगीतसूर्य' यांच्या चरित्राचे स्वागत.

संगीतसूर्य केशवराव भोसले यांची उपेक्षा झाली हे सत्यच आहे. या उपेक्षेला अनेक पैलू आहेत. संगीतसूर्यांच्या कार्याच्या संदर्भात फारसे दस्ताऐवजीकरण झाले नाही. त्यामुळे त्यांचे बद्दल फारशी माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. पण आज डॉ. सतीश पावडे यांनी लिहिलेल्या 'संगीतसूर्य केशवराव भोसले : आधुनिक मराठी रंगभूमीचे शिल्पकार', या चरित्र ग्रंथाने ही उणिव भरुन निघणार आहे. संगीतसूर्य केशवराव भोसले सांस्कृतिक परिषदेच्या कार्यासाठीही त्याची मदत होणार आहे.

संगीतसूर्यांचे चरित्र सर्व कलावंत, साहित्यिक, सांस्कृतिक कार्यकर्ते, कला रसिक, कला अभ्यासक यांचे पर्यंत पोचण्याची गरज आहे. त्यांचा खरा इतिहास लोकांपुढे येण्याची गरज आहे. या दृष्टिने डॉ. सतीश पावडे यांनी लिहिलेले हे चरित्र अत्यंत मोलाचे ठरणार आहे.

▪ शिवमती वर्षा धाबे

प्रदेशाध्यक्ष

संगीतसूर्य केशवराव भोसले

सांस्कृतिक परिषद, (महाराष्ट्र)

अविशा प्रकाशन

AVISHA

८४, अविशा, जैतवन सोसायटी, शास्त्री लेआऊट, खामला, नागपूर-४४००२५

ISBN : 978-81-944283-8-1

मूल्य : १००/–